परस्परं भावयन्तः
म प्र

मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ८७ ✦ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✦ सप्टेंबर २०११
वेबसाईट : www.marathepratishthan.org ✦ ई मेल : maratheparivar@yahoo.co.in
(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय



प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना सप्रेम नमस्कार,

"आदित्य् जायते वृष्टी:" म्हणजेच जोपर्यंत सूर्य आहे तोपर्यंत पाऊस निश्चित आहे. निसर्गाचे विलोभनीय रूप म्हणजे पावसाळा. अत्यंत आल्हाददायक हवामान, उन, पाऊस, फुलांचा दरवळ, हिरवीगार सृष्टी, आणि अविरत कोसळणारे धबधबे, जलधारांनी वृक्ष-वेली,धूसर ढगांनी व्यापलेले आकाश,समस्त सृष्टीला प्रफुल्लित करणाऱ्या अशा पावसाळ्यात आपला हितगुजचा अंक प्रकाशित होत आहे.

या अंकात, मराठे प्रतिष्ठानचे भीष्म-पितामह कुलवृत्तांतकार कै. भाऊसाहेब मराठे यांनी श्री. कालिदास मराठे यांना लिहिलेली पत्रे, श्री. वामन शंकर मराठे यांची मुलाखत तसेच अन्य ललित लेख, कविता प्रकाशित करीत आहोत.

दरवर्षीच मराठे प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) भरत असते. त्यासाठी अहवाल तयार करणे, हिशेब-तपासनीसाकडून वार्षिक हिशेब ठरावीक वेळेत तपासून घेणे हे अत्यंत कठीण काम. सी.ए. श्री. प्रभाकर मराठे हे काम गेली अनेक वर्षे काटेकोरपणे करतात. या अंकात आय-व्यय, ताळेबंद, हिशेबपत्रक दिले आहे.

महाराष्ट्र चित्पावन संघ पुणे दिनांक २४/२५ डिसेंबर या दिवशी सर्व चित्पावन-कुलांच्या संमेलनांचे आयोजन करणार आहे. याच वेळी पुण्यात 'चित्पवान फाऊंडेशन'द्वारा भव्य औद्योगिक प्रदर्शन भरणार आहे. या विषयी या अंकात सविस्तर निवेदन प्रसिद्ध केले आहे. मराठे कुलबांधव-भगिनींनी संमेलनात भाग घेऊन संमेलन यशस्वी करावे. त्या आधी दिनांक २५ सप्टेंबरला मराठे प्रतिष्ठानाची वार्षिक सर्वसाधारण सभा दादर येथे भरणार आहे. तेव्हा जास्तीत जास्त संख्येने या दोन्ही कार्यक्रमांना आर्वजून यावे. आपल्या उपस्थितीमुळे परिचय वाढतो, भेटीगाठींमुळे आत्मीयतेचे, प्रेमाचे नाते निर्माण होते.

'हितगुज'चा हा अंक हातात पडेल तेव्हा घराघरात गणपतीबाप्पा विराजमान झालेला असेल. ठिकठिकाणी सार्वजनिक गणेशोत्सव थाटामाटात साजरे होत असतील. यावेळी बॉम्बस्फोट करणाऱ्या शत्रूचा नाश होऊन दे आणि सर्व समाज भ्रष्टाचार मुक्त होऊ दे अशी प्रार्थना विघ्नहर्त्या गणरायाच्या चरणी करू या. कारण सत्ता माणसाला भ्रष्ट बनवत नाही, तर भ्रष्टाचारामागे असतं सत्तेपासून दूर जाण्याचं भय. सत्ता उपभोगणाऱ्यांना ती टिकवून ठेवण्याची आणि त्यापासून दूर असणाऱ्यांना ती मिळवण्याची हाव असते. असो

आपली शुभचिंतक
**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे**
(पृ.१२०)
८/१३ सहकार नगर, वडाळा,
मुंबई, ४०००३१
फोन ०२२-२४१५०८८९

### ✻ जाहीर निमंत्रण ✻

**मराठे प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा**

रविवार दिनांक २५ सप्टेंबर, २०११ सकाळी १० वाजता. अखिल भारतीय कीर्तन संस्था, विठ्ठल मंदीर हॉल, डी.एन.वैद्य रोड, दादर, मुंबई येथे आयोजित केली आहे.
सर्वांनी उपस्थित राहावे, हे आग्रहाचे निमंत्रण

◉ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे : ८/१३, सहकारनगर, वडाळा (पू.), मुंबई-४०००३१ ◉
दूरध्वनी : २४१५०८८९ ◆ ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com
◆ अक्षरजुळणी : सौ. अनघा विवेक मराठे, ठाणे. फोन : ९८३३१११९०२ ◆

# मराठ्यांचे ''विद्वांस'' कसे झाले? : एक अनुत्तरित प्रश्न

**प्रभाकर त्रिंबक विद्वांस (पृ.९८)**

हितगुज अंक ८४, डिसेंबर २०१० मध्ये श्री. चिं. म. मराठे यांनी 'मराठे' आणि त्यातून झालेल्या पोट आडनावांवर जिज्ञासा व्यक्त केली होती. त्योच निराकरण, सौ. मीना सदानंद मराठे यांनी 'चित्पावन दर्शन'च्या संदर्भाने करण्याचा प्रयत्न केला. (अंक ८६, जून २०११). मला जवळव जवळ १२-१५ वर्षांपूर्वी 'मराठे' मधून 'विद्वांस' आडनाव कसे झाले हा प्रश्न पडला होता. कार्यप्रसंगानिमित्ताने कोणी ज्येष्ठ विद्वांस व्यक्ती भेटल्यास त्यांच्याकडून काही आधारभूत माहिती मिळवण्याचा प्रयत्न (अयशस्वी) केला. त्या लोकांनी त्यांच्या वाड-वडिलांकडून ऐकलेल्या गोष्टी (किवदंती) सांगितल्या. त्यातील काही गोष्टी येथे देत आहे.

१. मराठे घराण्यातील एकजण वेदशास्त्रसंपन्न होऊन गेला आणि त्याला काशीहून 'विद्वांस' ही पदवी मिळाली

२. 'विद्वांस' हे 'विद्वान' या शब्दाचे अतिउच्च रूप (सुपरलेटिव्ह डिग्री) संस्कृतमध्ये आहे. ही पदवी पेशव्यांनी दिली.

वरील दोन विधानांचे तात्पर्य एवढेच की नक्की आधारभूत माहिती कुणाजवळ नाही.

वरील दोन विधानांवरून आणखी उपप्रश्न निर्माण होतात.

१. 'विद्वांस' ही तत्कालिन काशी विद्यापीठाची पदवी होती तर महाराष्ट्रातील कपी गोत्री 'मराठे' आणि शांडिल्य गोत्री 'थत्ते' यांनाच ती पदवी कशी मिळाली? तत्कालीन काशी अथवा इतर संस्कृत विद्यापीठाच्या पंडीत, शास्त्री, आचार्य, महामहोपाध्याय वगैरे पदव्या इतर प्रांतियांनी (उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, राजस्थान, गुजरात, आंध्र, कर्नाटक, तामिळनाडू) पण मिळविल्या आहेत आाणि त्यांचे वंशज ती आडनावे लावीत आहेत.

२. कोणत्या पेशव्यांनी कोणत्या मराठ्यांना विद्वांस ही पदवी दिली?

माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळविण्यासाठी मी एकमेव आधारभूत मराठे कुलवृत्तांताचे साहाय्य घेण्याचा प्रयत्न केला. मराठे कुलवृत्तांतात 'विद्वांस' घराणे तिसऱ्या पिढीपासून उपलब्ध आहे. पंचवीस वर्षांची एक पिढी मोजल्यास - तिसऱ्या पिढीचा साधारण इ.स. १६००चा काळ येतो. म्हणजे शिवछत्रपतींच्या जन्माआधी म्हणजे पेशव्यांनी ही पदवी दिली हा तर्क मोडीत निघाला.

हितगुज अंक ८६, जून २०११ मध्ये 'मराठे' आडनावांची उत्पत्ती बद्दल उल्लेख नाही.

आर्यावर्तातील ब्राह्मणांना भगवान परशुरामांनी पाचारण करून कोकणात बसविले असा चितपावनांचा इतिहास सांगितला जातो. आर्यावर्त थेट अफगाणिस्तान, बलुचिस्तान, पर्शिया (इराण), इराक, जर्मनी (युरोप) वगैरेपर्यंत पसरलेले होते असे इतिहास संशोधकांचे म्हणणे आहे. भारतात पंजाब, सिंध, काश्मिर इ. आर्य वर्चस्वाखाली होता. वरील सर्व ठिकाणांहून स्थलांतरित (कोकणात) झालेल्या ब्राह्मणांनी आपल्या मूळ गावांची आठवण राहावी म्हणून आपल्या नावांबरोबर मूळ गावांची नावे लावली असावीत. असा तर्क आहे. कालांतराने अथवा प्रादेशिक उच्चारांमुळे त्या मूळगावांचे अपभ्रंश होत गेले असावेत.

'थत्ते' आडनावाच्या एका जणाने सिंधमध्ये 'थान्तिया' नावाचे गाव आहे म्हणून थत्ते आडनाव पडले असे सांगितले. तसेच इराणमध्ये असलेल्या 'गोखल' वरून 'गोखले' आडनाव पडले असे ऐकले आहे. (खरे खोटे भगवान आणि त्या घराण्याचा मूळ पुरुष जाणे.)

या विषयावर लिहिण्यासारखे पुष्कळ आहे. पण 'हितगुज'च्या पानांच्या मर्यादा पाळणे उचित.

**- प्रभाकर त्रिंबक विद्वांस (पृ.९८)**
२, आरोही रेसिडेन्सी, सरदार पटेल रिंग रोड जवळ,
पो. बोपल, अहमदाबाद- ३८० ०५८ फोन : ९४२९१३२२८६

(हा संशोधनाचा विषय आहे. ज्यांना काही त्यासंबंधी माहिती असेल, कुठे वाचनात काही आले तर अवश्य कळवावे. 'हितगुज' मधून ते प्रसिद्ध केले जाईल. त्यामुळे ज्ञानात आणि माहितीत भर पडेल.)

-संपादिका

## श्री. वामन शंकर मराठे तथा दादा मराठे (एक सात्विक संत) सात्विक आणि सोज्वळ, सदाचारी आणि स्नेहशील संत

डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे

दैवालाही ज्या भाग्याचा हेवा वाटावा, असे दुर्लभ यश प्राप्त करणे ही एक साधना आहे. अखंड परिश्रम, जीवनावर असलेली निष्ठा आणि असीम त्याग करणे ज्यास जमते केवळ अशाच व्यक्तीपुढे यश, सन्मान, कीर्ती नतमस्तक होते. श्री. वामन शंकर तथा दादासाहेब मराठे अशाच व्यक्तींपैकी एक आहेत. त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधताना याची प्रचिती आली.

दादांचा जन्म दिनांक ७ सप्टेंबर १९२७ ला पुणे येथे आजोळी (जोशी) वामनद्वादशीच्या दिवशी झाला म्हणून त्यांचे नाव वामन ठेवले. बालपणापासूनची सर्व जडणघडण ठाण्यातच झाली. न्यू इंग्लिश स्कूल शाळेत त्यांचे शिक्षण झाले. उत्तम गुण मिळवून सर्वगुणसंपन्न विद्यार्थी असे त्यांनी नाव कमावले. दादांचे वडील श्री. शंकर विठ्ठल मराठे तर मातोश्रींचे नाव गिरिजाबाई. ह्या धार्मिक प्रवृत्तीच्या व प्रेमळ होत्या. खरं तर दादांना डेंटिस्ट व्हायची खूप इच्छा होती. पण आर्थिक परिस्थिती बेताची, पाठीमागे तीन लहान भाऊ व एक बहीण होती. कर्ज काढून शिक्षण घेणं त्यांच्या वडिलांना आवडत नव्हतं. तेव्हा चार पैसे मिळविण्यासाठी दादांनी विद्यार्थ्यांना लागणाऱ्या उत्तरपत्रिका विकायला सुरुवात केली. पुढे एका मित्राच्या जागेत 'विद्यार्थी भांडार' शालोपयोगी वस्तूंचे दुकान काढले. गणपती उत्सवाच्या वेळी गणेशमूर्ती व दसरा-दिवाळीच्या दिवसात फटाके विकले. विटांची भट्टी चालविली. हे सर्व सांभाळून शाळेत चिकाटीने अभ्यास करून दादा १९४५मध्ये मुंबई विद्यापीठातून मॅट्रीक पास झाले. त्यानंतर लगेचच वयाच्या अठराव्या वर्षी बॉम्बे पोर्ट ट्रस्ट मध्ये नोकरीस लागले. पण धंद्याची आवड असल्याने स्वत:चा व्यापार करण्याची इच्छा असल्यामुळे त्यांचे मन नोकरीत रमले नाही. त्यांचे काका यशवंत विठ्ठल मराठे यांच्या सोन्या-चांदीच्या पेढीत उद्योगधंद्याचा अनुभव घेण्यासाठी पंधरा वर्षे त्यांनी पेढीवर नोकरी केली. स्थिर पायावरील व्यापार कसा करावा याचे धडे ते काकांकडून शिकले म्हणून काकांना आदराने ते गुरूस्थानी मानतात. ज्यावेळी गोल्ड कंट्रोलचा कायदा आला त्यावेळी त्याचा धंद्यावर खूप परिणाम झाला. अशावेळी काही लोक (सेल्समन) काकांना कमी करावे लागले. अशावेळी समजूनच वामनरावांनी स्वत: काकांना सांगून त्यांच्या अनुमतीने ते तिथून सेवानिवृत्त झाले. आणि त्याचवेळी काकांचा मोठा मुलगा आनंद हा दुकानात येऊ लागल्यामुळे काकांचीही अडचण होणार नाही. हे लक्षात येऊन वामनरावांनी स्वत: काही वेगळी लाईन चालू करावी असं ठरवलं.

### सुवर्णकार
### मे. वामन शंकर मराठे प्रा. लि.

वामनरावांनी धाकट्या भावाला 'सिटी जनरल स्टोअर' दुकान काढून दिले. त्याचप्रमाणे 'शृंगार साडी भांडार' हे दुकान काढले. त्यांना मनातून सोन्या-चांदीचे दुकान काढावयाचे होते, पण काकांशी स्पर्धा नको या हेतूने ते थांबले. पण वामनरावांवर पुत्रवत प्रेम असणाऱ्या काकांनीच त्यांना मनाच्या मोठेपणाने स्वत:ची पेढी सुरू करण्याचा समादेश (सल्ला) दिला. पडत्या फळाची आज्ञा प्रमाण मानून वामन-रावांनी १९७१ साली 'शृंगार आर्ट ज्वेलर्स' हे चांदीचे दुकान थाटले. पुढे याचे नामकरण 'मे. वामन शंकर मराठे प्रा. लि.' असे झाले. लोकांचा विश्वास मिळविण्यासाठी वामनरावांनी अथक परिश्रम व सचोटीची जोड या धंद्याला दिली. ग्राहकांना सुविधा, संतोष आणि समाधान देऊन दादांनी हे यश मिळविले. राम मारुती रस्त्यावर 'वामन शंकर मराठे ज्वेलर्स' हे हिरे, मोती, पाचू, रत्ने, माणिक यांचे भव्य व आकर्षक दुकान थाटले. गुणवत्ता, विश्वास, ग्राहकहित दक्षता, वक्तशीरपणा या गोष्टी वर्षानुवर्ष दादांनी जपल्या त्याच गोष्टी त्यांची दोन्ही मुले आणि सुना याही व्यवसाय जपत आहेत, सांभाळत आहेत. दादांच्या कर्तृत्वाची अशी ही कहाणी आहे.

### गृहस्थाश्रमी

वामनरावांचा विवाह वयाच्या २८व्या वर्षी १९५६ साली सौ. शीलाताईंबरोबर (पंचागकर्ते कृ. वि. सोमण यांची कन्या) झाला. लग्न झाल्यावर सौ. शीलाताई मॅट्रीक, बी.ए., एम.ए. झाल्या. परस्परांना पूरक आणि पोषक असे त्यांचे



विधान परिषदचे उपसभापती श्री. वसंतराव डावखरे यांच्या हस्ते ठाणे महानगरपालिकेचे ठाणे भूषण, २००० हा पुरस्कार स्वीकारताना श्री. दादा मराठे

व्यक्तिमत्त्व असल्याने एक आदर्श दाम्पत्य ते ठरले आहेत. अर्थ शब्दात असतो, त्याहूनही तो जीवनात अधिक असतो. हा 'अर्थ' आपल्याला दादांच्या जीवनात आढळून येतो. माणसाचे आयुष्य त्याच्या जगण्याच्या पद्धतीवर अवलंबून आहे. शनिवार-रविवारच्या सुट्टीत पत्नीला घरी स्वयंपाक करू न देता हॉटेलात फास्ट फूड जेऊ घालणारा पती, आज प्रतिष्ठित समजला जाता, पण ज्या स्त्रिया आपला पती जीवनात सदैव पुढे राहावा म्हणून त्याला सर्वतोपरी सहकार्य करतात, त्याला घरी स्वत: तयार केलेलं जेवणच जेऊ घालतात. ते कुटुंबच दीर्घायु ठरत असते. शीलाताई या स्वयंपाक उत्तम करतात. सांजाच स्वादिष्ट गोड पोळ्या खाव्या त्या त्यांच्या हातच्याच. सौ. शीलाताई-सारख्या 'सुगरण'गृहिणी दादांना लाभल्या हे त्यांचे भाग्यच. सौ. शीलाताई या 'गृहिणी, सचिव: सखी मिथ: प्रियाशिष्या ललिते कलाविधौ' अशा सहधर्मचारिणी आहेत. त्यांचा मोठा मुलगा अजित त्याची पत्नी सौ. अनिता, अपूर्वा आणि अंकुश ही त्यांची दोन मुले तर धाकटा मुलगा अभय त्याची पत्नी सौ. अनुजा, अरुता व अमर ही त्यांची मुले सुखाने एकत्र कुटुंबात, भरल्या घरात आनंदाने राहत आहेत याचे श्रेय सौ. शीलाताई व दादांकडे जाते.

## सामाजिक संस्थांमध्ये कार्यरत

दादासाहेबांनी १९६३ ते १९६८ अशी पाच वर्षे नगरसेवक म्हणून नि:स्वार्थीपणे लोकांची सेवा केली. संघाचे प्रचारक होते. ब्राह्मण पतपेढी, ठाणे, ब्राह्मण सेवा संघ, ब्राह्मण सभा, पिपल्स एज्युकेशन सोसायटी, श्री ज्ञानदेव सेवा मंडळ, उपवन गणपती, सरस्वती एज्युकेशन सोसायटी, मराठी ग्रंथ संग्रहालय, समाजसेवा केंद्र, अशा अनेक सामाजिक संस्थांमध्ये त्यांनी पदभार सांभाळला. दादा हे केवळ अध्यक्षपद भूषविणारे नव्हते तर हाडाचे कार्यकर्ते होते. सर्व संस्था त्यांनी समृद्ध करून नावारूपाला आणल्या; परंतु ते पंच्याहत्तर वर्षांचे झाल्यावर त्यांच्या अमृत-महोत्सवी वर्षात एकेका संस्थांमधून सन्मानाने पायउतार झाले. निवृत्ती घेतली. आज म्हातारपणीही सत्तेची खुर्ची सोडायला तयार नसणारे स्वार्थी राजकारणी पाहिले की वाटते खरोखर दादासाहेबांनी तरुणांना वाव मिळावा, त्यांना काम करण्याची संधी द्यावी या चांगल्या हेतूने पदांचा राजीनामा दिला. कितीतरी असामान्य गुण या वरवर सामान्य आणि साध्या वाटणाऱ्या व्यक्तिमत्त्वात मला दिसले. कर्तव्यदक्षता आणि सद्भावना यांचे प्रतीक मक्हणेज दादासाहेब - ऐश्वर्य आणि दातृत्व हे दोन्ही त्यांच्यापाशी आहे. माणसाचे मन मोठे असले पाहिजे. दातृत्व हे नुसते पैशांवर अवलंबून नसते. ते तुमच्या वागण्यबोलण्यातून, प्रत्येक कृतीतून दिसत असते. 'मी हे केले', 'मी ते केले' असा बडेजाव बोलताना कुठेही मला जाणवला नाही. ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे शूचिनां श्रीमतां गेहे' असेच त्यांचे वर्णन करावे लागेल.

## श्री ज्ञानदेव सेवा मंडळ

दादांना मुळात अध्यात्माची आणि परमार्थाची आवड होती. त्यांच्या आईकडून हा गुणवारसा त्यांना मिळाला असावा. श्रावणात गायत्री पुरश्चरण करीत, लेले महाराज यांचे मार्गदर्शन लाभले होते. १९७३ साली दादांनी ज्ञानदेव सेवा मंडळाची स्थापना केली. पाचपाखाडी येथे भव्य ज्ञानेश्वर मंदिर, ज्ञानराज व निवृत्तीनाथ सभागृह बांधले. या कामी त्यांना त्यांचे मित्र कै. पु. मो. परचुरे व ह. भ. प. कै. द. स. शिंदे यांचे बहुमोल सहकार्य लाभले. १९७५ साली दादांनी वारकरी संप्रदायाची दीक्षा घेतली व ते माळकरी झाले. पंढरपूर-आळंदीची वारी पायी आजतागायत चालू ठेवली आहे. या मंडळाद्वारा सोपान नेत्र रुग्णालय, आरोग्यसेवा, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, धार्मिक ग्रंथांचे वाचनालय, मुक्ताई भजनी मंडळ इ. अनेक सामाजिक कार्य चालू आहेत. विशेष म्हणजे आषाढी-पंढरपूर वारीत फिरत्या दवाखान्याद्वारे विनामूल्य औषधसेवा पथकाची आरोग्यदिंडी निघते.

## प्रवासाची आवड

दादांनी सपत्नीक सर्व महाराष्ट्राचा प्रवास, कन्याकुमारी ते काश्मीर, अमरनाथ यात्रा, परदेशवारीही केली आहे. त्यांनी स्वत: यात्राकंपनी काढली होती. अनेक धार्मिक सहलींचे आयोजन केले होते. १९६४ साली ठाण्यात पहिली अष्टविनायक यात्रा दादांनी काढली. विशेषत: म्हाताऱ्या आणि स्त्रिया ज्यांना सोबत हवी असते अशांसाठी त्यांनी त्यांची सोय व्हावी म्हणून यात्रा कंपनी काढून उत्तम व्यवस्था ठेवली.

## वाङ्मयीन सेवा

युगानुयुगे जीवांना आधार आणि शांती, भक्ती आणि मुक्ती प्राप्त करून देणारी अक्षय संजीवनी अशी ज्ञानेश्वरी आहे. ज्ञानेश्वरी ग्रंथाला ७००वर्षे झाली. त्या प्रसंगाचे औचित्य साधून दादांनी स्वहस्ताक्षरात संपूर्ण ज्ञानेश्वरी नऊ महिन्यात लिहून पूर्ण केली. नित्यपाठ भजन मालिका, श्री हरिपाठ, गुरुवारचे अभंग, एकनाथ महाराजकृत चिरंजीवपद, मराठी व इंग्रजीसह हरिपाठ इ. अनेक पुस्तकांचे संपादन व संकलन, प्रकाशन दादांनी केले आहे. अमेरिकेत (सव्वा लाख)



विद्यावाचस्पती श्री. शंकर अभ्यंकर यांचे हस्ते सत्कार करताना

**निधी-संकलनसारखी कठीण गोष्ट दादांनी सहज केली. देणग्या मिळविल्या आणि अनेक सामाजिक संस्थांना आर्थिक मदतीचा हात दिला. अंदमानला सुनामीचा तडाखा बसला तेव्हा एक लाखाचा धनादेश दिला. आळंदी संस्थानने ज्ञानेश्वरी मार्बलवर कोरून भिंतीत फरशा बसवून घेण्याचे ठरविले. एका फरशीला १५००रु. खर्च येत होता. तेव्हा दादांनी अडीचलाख रु. जमवून दिले.**

हरिपाठाच्या प्रतींचा विक्रमी खप झाला आहे. त्याविषयी सांगताना दादासाहेब म्हणाले, 'अनेक मराठी कुटुंब अमेरिकेत स्थायिक झाली आहेत. तिथे त्यांना मान-सन्मान आणि ऐश्वर्य मिळतं, पण मन:शांती मिळत नाही, मनाला शांती देणारे 'हरिपाठा' सारखे सोपं साधन त्यांना हवंसं वाटू लागला आहे. अमेरिकेतील ॲटलांटा या शहरातील भाविकांनी 'हरिपाठ मंडळा'ची स्थापना केली आहे. तिथे सामुदायिक पठण हरिपाठाचं रोज केलं जातं. दादांची नात अपूर्वाही या 'हरिपाठा' मंडळाची सदस्या आहे. तिने हरिपाठ इंग्रजीत असता तर त्याचा चांगला लाभ घेता आला असता हे सांगितल्याबरोबर त्याच रात्री 'हरिपाठ' चं इंग्रजी लिपीत लेखन दादांनी सुरू केलं. आज इंग्रजी हरिपाठाला प्रचंड मागणी आहे.

### मानसन्मान-पुरस्कार

ठाणे नगरीत दादांचे कर्तृत्व फुलले, सेवाभावी, नि:स्वार्थीपणे लोकोपयोगी अनेक कामे केल्यामुळे त्यांच्या कार्याची दाद समाजाने घेतली. अनेक संस्थांनी दादांचा सत्कार करून आपली कृतज्ञता व्यक्त केली. १९९६ साली हनुमान व्यायामशाळेत शंकराचार्यांच्या उपस्थितीत मोठा यज्ञ झाला त्याचे यजमानपद दादांना मिळाले. १९८५ साली ज्ञानेश्वर माऊलीच प्रतिष्ठापना करण्याचा मान दादांना मिळाला. ठाणे भूषण पुरस्कार २००२ मध्ये, ठाणे प्लसतर्फे २००३ साली एकत्र कुटुंबाला पहिले बक्षीस मिळाले. मद्रासी लोकांच्या शिवस्थान संस्थेत महारूद्र यागात अध्यक्षपद दादांना मिळाले, यज्ञात गाईची पहिली पूजा करण्याचा मान मिळाला. ठाणे नगरपालिकेत १०० वर्षे पूर्ण झाली त्यावेळी दादांचा सत्कार केला. सावरकर प्रतिष्ठान पुरस्कार, आदर्श दाम्पत्य पुरस्कार इ. अनेक पुरस्कार अलीकडे दिनांक ११-४-२०११दादांना नवरत्न पुरस्कार मिळाला. आज तरुण पिढीला, 'सदाचारी राहा, आपल्या वाट्याला आलेले काम आनंदाने, कर्तव्यबुद्धीने करा' असा संदेश दादा देतात. श्री ज्ञानेश्वर महाराजांनी 'पसायदाना'त 'वर्षत सकळ मंगळी। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी। अनवरत भूमंडळी भेटो तया भूता।' असे मागणे विश्वात्मक देवाजवळ मागितले आहे. दादांना भेटल्यावर मला तसाच अनुभव आला. दादांच्या व्यक्तित्वात मला एका सात्विक, सोज्वळ, स्नेहशील संताचं मनोरम दर्शन झालं. दिवसाला दिवस जोडीत सर्वांचेच आयुष्य वाढत असते. पण दादांसारखी कृतीशील, कर्तृत्ववान माणसे त्या दिवसांना आपल्या कार्यांने जिवंतपणा आणीत असतात. नवचैतन्य देत असतात व खऱ्या अर्थाने मोठी होती असतात.

आज समाज वैफल्यग्रस्त, सचिंत झाला आहे. त्याग, सेवा, सचोटी, ध्येय अशी जीवनमूल्ये हरवत चालली आहेत. अशावेळी दादांनी भक्कमपणे उभी राहून, सुंस्कारित जीवन घडविण्याचे कार्य केले आहे. दादांचे उर्वरित आयुष्य निरोगी, निरामय, आनंदाचे, समाधानाचे जावो ही माऊलीचरणी प्रार्थना - जीवेत् शरद: शतम्।

मराठे प्रतिष्ठानद्वारे अभिष्टचिंतन!

**- डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे**
**(पृ.१२०)**
संपादिका:हितगुज मराठे प्रतिष्ठान
८/१३, सहकारनगर, वडाळा, मुंबई

## वाचकांचा पत्रव्यवहार

हितगुजचा जून २०११चा अंक पोहोचला. अंक नेहमीप्रमाणेच चांगलाच आहे. श्री. मोहनराव मराठ्यांनी मुकुंदाला वाहिलेली श्रद्धांजली हृद्य आहे. श्री. सदाशिव बळवंत मराठे यांचा 'जुन्या बडोद्याच्या स्मृती' हा लेख रोचक व वाचनीय आहे. तसेच बक्षीसपात्र म्हणूनच आहे. श्री. मोहन मराठ्यांचाा परमहंस परिव्राजकाचार्य श्री वासुदेवानंद सरस्वती यांच्या कृपेचा अनुभव भारावून टाकतो. संतश्रेष्ठ श्री एकनाथांविषयीचा आपला स्वत:चा लेख ललित आणि संग्राह्य आहे. इतर सगळे लेख दर्जेदार व वाचनीय आहेत. अंक हाती घेतला व पूर्ण वाचूनच खाली ठेवला.

**श्रीराम व्यंकटेश मराठे (पृ.४३)**
बि.नं.२, फ्लॅट नं. ६, चंद्रलोक नगरी, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे ४११०३८

## 'हितगुज'साठी जाहिराती द्याव्यात

अभिनंदन, अभिष्टचिंतन, पुण्यतिथी, पुण्यस्मरण, साठावा वाढदिवस, अमृतमहोत्सव, सहस्त्रचंद्रदर्शन या निमित्ताने किंवा आपल्या उद्योगव्यवसायाच्या जाहिराती देऊन 'हितगुज'ला सहकार्य करावे.

पाव पान रु. ६००/-
अर्धे पान रु. १,२००/-
पूर्ण पान रु. २,५००/-

रक्कम 'मराठे प्रतिष्ठान' नावाने मुंबईतल्या पत्त्यावर चेकने पाठवावी.

ॐ

# मराठे प्रतिष्ठान

सार्वजनिक विश्वस्त नोंदणी कअ.७९१८ (मुं.) दिनांक १२-१-८१
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५
दूरध्वनी : २४३०२४५३ * फॅक्स : ९१-०२२-२४३७९८६३ * e-mail : maratheparivar@yahoo.com

**२९ वा वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके :** १ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०११
**वार्षिक सर्वसाधारण सभा :** रविवार २५ सप्टेंबर, सकाळी १० वाजता
**सभास्थान :** अखिल भारतीय कीर्तन संस्था, विठ्ठल मंदीर हॉल, डी.एन.वैद्य रोड, दादर, मुंबई

## विश्वस्त मंडळ

| | | दूरध्वनी | वास्तव्य | कुवृप्र |
|---|---|---|---|---|
| १. श्री. आनंद यशवंत मराठे | विश्वस्त-कार्याध्यक्ष | २५४२५५२४ | ठाणे, प. | २७७ |
| २. श्री. अरविंद दामोदर मराठे | विश्वस्त | ०२५१-२५७०६७७ | डोंबिवली- पू. | २९२ |
| ३. श्री. विनायक केशव मराठे | विश्वस्त | २४३०३३२९ | वरळी, मुंबई | ०२० |
| ४. श्री. वामन गणेश मराठे | विश्वस्त | २८२६९४०२ | जोगेश्वरी, पू. मुंबई | ५०३ |
| ५. श्रीमती सुलभा सुरेश मराठे | विश्वस्त | २४४४३०७४ | माहिम, मुंबई | ३९९ |

## कार्यकारी मंडळ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. श्री. आनंद यशवंत मराठे | विश्वस्त- कार्याध्यक्ष | २५४२५५२४ | ठाणे, प. | २७७ |
| २. श्री. रमाकांत माधव विद्वांस | उपाध्यक्ष | २४३०५२६० | माटुंगा, मुंबई | ६२३ |
| ३. श्री. मोहन सदाशिव मराठे | कार्यवाह | २४४६४३५१ | खार,प. मुंबई | ३६५ |
| ४. श्री. हेमंत अरुण मराठे | सहकार्यवाह | ०२५०-२४३३०३८ | नालासोपारा | ०२१ |
| ५. श्री. प्रभाकर दामोदर मराठे | कोषाध्यक्ष | २४१५०८८९ | वडाळा, मुंबई | १२ |
| ६. श्री. लक्ष्मण शंकर मराठे | सभासद | २५६८०१०४ | मुलुंड, पू. मुंबई | ५२० |
| ७. श्री. सीताराम गोपाळ खांबेटे | सभासद | २६८३६९९४ | अंधेरी, पू. मुंबई | ६७६ |
| ८. श्री. चिंतामण महादेव मराठे | सभासद | २४१५५३९० | परळ, मुंबई | २२२ |
| ९. सौ. आदिती यशवंत मराठे | सभासद | २४४४९२७४ | माहीम, मुंबई | ३९९ |
| १०. सौ. वर्षा शरद मराठे | सभासद | २८४१६७८७ | गोरेगाव, मुंबई | ०२१ |
| ११. डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे | सभासद | २४१५०८८९ | वडाळा, मुंबई | १२० |
| १२. श्री. अरुण दत्तात्रेय मराठे | सभासद | ०२०-२४४७३२८१ | पुणे | ०६१ |
| १३. सौ. नीलांबरी रमेश मराठे | सभासद | ०२०-२४४५६२७० | पुणे | २८० |
| १४. श्री. अरविंद दामोदर मराठे | विश्वस्त (कायम निमंत्रित) | ०२५१-२५७०६७७ | डोंबिवली- पू. | २९२ |
| १५. श्री. यशवंत सुरेश मराठे | कायम निमंत्रित | २४४४९२७४ | माहीम, मुंबई | ३९९ |
| १६. श्री. सुरेश मराठे | कायम निमंत्रित | ०२५१-२४९४९५७ | डोंबिवली, पू. मुंबई | ५०३ |

**बँकर्स : १. सारस्वत बँक, प्रभादेवी, मुंबई * २. युको बँक, टिळक रोड, पुणे**

## २९वा वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके (१ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०११)

सभासद बंधू भगिनींनो,

मराठे प्रतिष्ठानचा दिनांक ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षाचा म्हणजे २९ वा वार्षिक अहवाल कायर्रकारी मंडळ सादर करीत आहे.

**सभासद :** वृत्तांतसाली आजीव सदस्य संख्या (१४३१) ५ ने वाढून १४३६ झाली. हितचिंतक संख्या ९, आश्रयदाता संख्या २१ राहिली. सन्माननीय सदस्य संख्या (३) कायम राहिली. या वर्षीच्या सर्व नवीन सदस्यांचे मराठे प्रतिष्ठान स्वागत करीत आहे.

‘हितगुज’ची तहहायत वर्गणीदार संख्या ११३२ राहिली.

मराठे प्रतिष्ठानच्या आजीव सदस्यत्वासाठी प्रत्येक सज्ञान स्त्री-पुरुष व्यक्तीने किमान १००रु. शुल्क पाठवावे व प्रत्येक कुटुंबासाठी कुटुंब प्रमुख सदस्याने रु.१०००/- ‘हितगुज’ तहहयात शुल्क आमचेकडे पाठवून मराठे प्रतिष्ठानला सहकार्य करावे.

**टीप :** आजीव सदस्यत्व त्या व्यक्तीच्या हयातीपर्यंत असते. त्या व्यक्तीच्या निधनानंतर पुढील कुटुंब प्रमुखाने आजीव सदस्यत्व तसेच हितगुज तहहयात शुल्क भरावयाचे असते.

**वार्षिक सर्वसाधारण सभा :** मराठे प्रतिष्ठानची २८वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १ ऑगस्ट २०१० रोजी सायंकाळी ५ वा दामले योग केंद्र माटुंगा येथे भरली. कुलबांधवांनची उपस्थिती बेताचीच होती. (२९व्या सर्वसाधारण सभेला कुलबांधवांची चांगली उपस्थिती असावी ही अपेक्षा). २८व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत कार्यवाहानी अहवाल वाचून दाखवला. हितगुज स्वरुपाबाबत संपादकीय आवश्यक आहे. ते थोडक्यात लिहिले जावे असे ठरले.

श्री. मंदार भावे, चार्टर्ड अकाउंट यांची हिशेब तपासनीस म्हणून वार्षिक १०००रु. मानधनावर निवड झाली. माननीय अध्यक्षांनी प्रतिष्ठानच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला. आणि वास्तुप्रकल्पाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे असे सांगितले. गुणवत्ता पारितोषिके घ्यायला विद्यार्थी येत नाहीत अशी खंत व्यक्त केली. प्रतिष्ठानकडील निधी वास्तूप्रकल्पासाठी उपयोगात आणावा ह्यास उपस्थितांची संमती दिली. कार्यवाहांनी कर्नाटकात मराठे प्रतिष्ठानची शाखा १८-२-२०१०ला स्थापन झाल्याचे सांगितले. श्री. गोविंदराव मराठे अध्यक्ष व श्री. अनंत वामन मराठे उपाध्यक्ष झाले.

## : अहवाल वर्षातील महत्त्वाच्या नोंदी पुढीलप्रमाणे :

१. १० एप्रिल २०१० रोजी मराठे प्रतिष्ठानची विशेष सर्वसाधारण सभा झाली. ती मध्ये प्रतिष्ठानच्या घटनेत दुरुस्त्यांना मंजुरी देण्यात आली.

२. हितगुजची मराठे परिवारात आतुरतेने वाट पाहिली जाते. दिवसेंदिवस हितगुज परिवारात प्रिय होत आहे. त्याच्या मदतीसाठी सदस्य आर्थिक ओघ जमत आहे. त्रैमासिकाऐवजी मासिक किमान द्विमासिक व्हावे अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. परिवारातील सदस्य आपले बरेवाईट अनुभव साहित्यिक शैलीत व्यक्त करत आहेत. प्रा. भा. ल. महाबळांसारखे नामवंत लेखक स्तुतीसुमनेह वाहत आहेत.

## मानसन्मान

**१. अरविंद वासुदेव मराठे** ह्यांना नॅशनल इकॉनॉमिक डेव्हलपमेंट ऑफ रिसर्च ऑर्गनायझेशनचा भारतीय उद्योग रत्न पुरस्कार मिळाला.

**२. श्री. जनार्दन गोविंद मराठे,** आगाशी ह्यांनी श्री. विद्यारण्य स्वामींनी मूळ संस्कृत भाषेत लिहिलेल्या आद्य शंकराचार्यांच्या चरित्राचे मराठीत श्री शंकर दिग्विजय या नावाने प्रसिद्ध केले.

**३. श्री. विलास भिकाजी मराठे** (पृ.३६५) मुंबई पोलीस दलातील ए.सी.पी. ह्यांचा १५ ऑगस्ट २०१० ह्या स्वातंत्र्य दिनी राष्ट्रपती पदकाने सन्मान करण्यात आला. गुंडांच्या अनेक कारवायाविरोधात आणि तपासात महत्त्व पूर्ण कामगिरी केल्याबद्दल हे पदक बहाल करण्यात आले.

**४. निखील शंतनू मराठे** (अ. स. मराठेंचा नातू) ह्याची अमेरिकेतील विख्यात गुगल कंपनीतकडून तीन महिन्याच्या प्रोजेक्टसाठी निवड झाली. हा प्रोग्रॅम करणाऱ्यांची जागतिक परिषद फिनलंडमध्ये ३ ते १० जुलै २०१० झाली. तीत भाग घेण्याचा बहुमान निखिलला मिळाला.

**५. अपूर्वा मराठे** (१५६) : राजापूरच्या नगराध्यक्षपदी शिवसेनेच्या उमेदवार नगराध्यक्षपदी २५-११-२०१० रोजी निवडून आल्या.

**६. श्री. वि. म. मराठे** (पृ. २३५) निवृत्त कार्यकारी अभियंता यांना १५-९-२०१० रोजी रोटरी क्लब ऑफ कृष्णा व्हॅलीतर्फे जीवनगौरव पुरस्कार सांगलीचे महापौरांचे हस्ते प्रदान करण्यात आला.

**७. चित्रकार कुमुद मराठे डोके** (पृ.३६६) यांना पेटिंगच्या कामाबद्दल रोटरी क्लब ठाणे तर्फे १०-१०-२०१० रोजी मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

**८. बुद्धिबळपटू सोहन फडके - नीलिमा राजाराम मराठे** (घराणे ५) - सासरच्या सौ. नीलिमा फडके ह्यांचा मुलगा - भारताच्या सर्वोच्च १०० खेळाडूत व जागतिक पातळीवर २२८४ क्रमांकावर नोंद.

**९. श्री. अभय मराठे** (पृ.२७७) ह्यांनी दसरा २०१० ला हैद्राबादमध्ये सोने-हिरे दागिन्यांचा व्यवसाय सुरू केला.

**१०. श्री. रत्नाकर सुंदर मराठे** (पृ. १७०) ह्यांना ब्राह्मणसभा गिरगाव, मुंबई ह्या संस्थेतर्फे प्रज्ञावंत पुरस्कार मिळाला. प.पू. पांडुरंग शास्त्री आठवले यांच्या तत्त्वज्ञान विद्यापीठातील कामाबद्दल व स्वाध्याय कार्यात सक्रिय सहभागी झाल्याबद्दल आहे.

THE BOMBAY PUBLIC TRUST ACT,1950
SCHEDULE VIII
[VIDE RULE 17 (1)]

NAME OF THE PUBLIC TRUST : **MARATHE PRATISHTHAN** REG. NO. E-7918 (BOM)

INCOME & EXPENDITURE ACCOUNT FOR THE YEAR ENDED : **31ST MARCH, 2011**

| EXPENDITURE | RS. | RS. | INCOME | RS. | RS. |
|---|---|---|---|---|---|
| To Audit Fees | | 750.00 | By Intersest on Fixed Deposits | | 2,415.15 |
| To Expenditure on the objects of Trust | | | By Interest on Saving Bank Account | | |
| Mumbai Mukya Karyalaya Expeneses | | | With Saraswat Co-op Bank, Worli | 7,407.00 | |
| Annual Meeting Expenses | 1,780.00 | | With UCO Bank, Pune | 6,109.00 | 13,516.00 |
| Postage & Distribution | 10.00 | | | | |
| Kulvritant (Xerox) | 3,706.00 | | By Hitguj Prakashan Income | | |
| Bank Charges | 55.15 | 5,551.15 | Advertisements | 7,600.00 | |
| | | | Transfer From Hitguj Nidhi | 88,108.00 | 95,708.00 |
| Pune Branch Expenses | | | | | |
| Miscellaneous Expenses | 791.00 | | By Sale of Kulvritant | | 3,000.00 |
| Postage & Distribution (PU) | 180.00 | 971.00 | | | |
| Pune Vardhapan Din Expenses | | | | | |
| Printing, Distribution Etc. | | 7,171.00 | | | |
| To Hitguj Praskashan Expenses | | | | | |
| Hitguj Printing (MU) | 64,287.00 | | | | |
| Hitguj Postage (MU) | 30,745.00 | | | | |
| Hitguj Postage (PU) | 676.00 | 95,708.00 | | | |
| To Income & Expenditure Account | | | | | |
| Surplus Being Excess of Income | | | | | |
| Over Expenditure C/F To Balance Sheet | | 4,488.00 | | | |
| | **TOTAL** | **1,14,639.15** | | **TOTAL** | **1,14,639.15** |

Note : The Headings as per the Prescribed
Form which are absent in the above
Statement Should be read As 'NIL'
For MARATHE PRATISHTHAN

TRUSTEE TRUSTEE

Subject to our report of Even Date
For HMA & Associates
Chartered Accountants

Partner
Membership No. 103650
MUMBAI DATED 22-08-2011

**THE BOMBAY PUBLIC TRUST ACT, 1950**
**SCHEDULE VIII**
**[VIDE RULE 17 (1)]**

NAME OF THE PUBLIC TRUST : **MARATHE PRATISHTHAN** **REG. NO. E-7918 (BOM)**

**BALANCE SHETT AS AT... : 31ST MARCH,2010**

| FUNDS AND LIABITLIES | RS. | RS. | PROPERTY AND ASSETS | RS. | RS. |
|---|---|---|---|---|---|
| **Kayam Nidhi** | | | **Investments** | | |
| Balance as per Last Balance Sheet | 1,87,895.00 | | Fixed Deposits With | | |
| Add : Life Membership (MU) | 100.00 | | Saraswat Co-op. Bank, Worli | 1,97,851.00 | |
| Add : Life Membership (PU) | 400.00 | 1,88,395.00 | Cosmos Co-op. Bank, Dadar | 1,65,000.00 | |
| | | | Janata Sahakari Bank, Dadar | 1,82,542.00 | |
| **Kulvruttant Nidhi** | | | Jan Kalyan Sah. Bank, Dadar | 75,000.00 | |
| Balance as per last Balance Sheet | 19,120.00 | | Jan Kalyan Sah. Bank, Sion | 2,97,749.30 | |
| Add : Interest | 1,530.00 | 20,650.00 | Jan Kalyan Sah. Bank, Shivaji Park | 1,10,000.00 | |
| | | | UCO Bank, Pune | 3,17,563.00 | |
| | | | U.T.I. - C.R.T.S. | 59,000.00 | 14,04,705.30 |
| | **TOTAL C/F** | **2,09,045.00** | | **TOTAL C/F** | **14,04,705.30** |

| | TOTAL B/F | 2,09,045.00 |
|---|---|---|
| **Shikshan Nidhi** | | |
| Balance as per last Balance Sheet | 5,12,118.00 | |
| Add : Donations (MU) | 2,250.00 | |
| Add : Donations (PU) | 6.001.00 | |
| Add : Interest | 41,631.00 | 5,62,000.00 |
| **Sureshbhau Smruti Nidhi** | | |
| Balance as per last Balance Sheet | 77,457.00 | |
| Add : Interest | 6,197.00 | 83, 654.00 |
| **Udyog Pravartan Nidhi** | | |
| Balance as per last Balance Sheet | 58,944.00 | |
| Add : Donations | 2,000.00 | |
| Add : Interest | 4,876.00 | 65,820.00 |
| **Vishishta Hetu Nidhi** | | |
| Balance as per last Balance Sheet | 1,68,775.00 | |
| Add : Interest | 13,497.00 | 1,82,272.00 |
| **Yuva Manch Nidhi** | | |
| Balance as per last Balance Sheet | 1,561.00 | |
| Add : Interest | 125.00 | 1,686.00 |
| **Udyojakta Paritoshah Nidhi** | | |
| Donations During the Year | 21,000.00 | |
| Add : Interest | 1,680 | 22,680.00 |
| **Vaidyakiya Madat Nidhi** | | |
| Balance as per last Balance Sheet | 39,515.00 | |
| Add : Interest | 3,161.00 | 42,676.00 |
| **Hitguj Nidhi** | | |
| Balance as per last balance Sheet | 3,41,838.92 | |
| Add : Donation (MU) | 16,100.00 | |
| Add : Subscription (PU) | 3,000.00 | |
| Add : Interest | 28,876.00 | |
| Less : Transfer to I & E A/c | (88,108.00) | 3,01,706.92 |
| **Vinay Khambete Smruti Yojana** | | |
| Balance as per last Balance Sheet | 72,854.00 | |
| Add : Interest | 5,829.00 | 78,683.00 |
| **Anita Khambete Smruti Yojana** | | |
| Balance as per last Balance Sheet | 14,450.00 | |
| Add : Interest | 1,157.00 | |
| Less : Transfer to I & E A/c | - | 15,607.00 |
| **Ganesh Tantric Shikshan Yojana** | | |
| Balance as per last Balance Sheet | 23,954.00 | |
| Add : Interest | 1,916.00 | 25,870.00 |
| **Hindi Paritoshik Yojana** | | |
| Balance as per last Balance Sheet | 1,466.00 | |
| Add : Interest | 117.00 | 1,583.00 |
| **Vaidik Shikshan Yojana** | | |
| Balance as per last Balance Sheet | 20,195.00 | |
| Add : Interest | 1,616.00 | 21,811.00 |
| | TOTAL C/F | 16,15,093.92 |

| | TOTAL B/F | 14,04,705.30 |
|---|---|---|
| Interest Receivable | | |
| On Fixed Deposits With | | |
| Jan kalyan Sah. Bank Ltd., Sion | 29,431.00 | |
| UCO Bank, Pune | 27,265.62 | 56,696.62 |
| **T. D.S. Receivable** | | |
| For 1998-1999 | 2,262.00 | |
| For 1999-2000 | 4,968.00 | |
| For 2000-2001 | 2,188.00 | |
| For 2001-2002 | 2,296.00 | |
| For 2002-2003 | 2,002.00 | |
| For 2003-2004 | 696.00 | 14,412.00 |
| **Cash and Bank Balances** | | |
| Cash on Hand with | | |
| Mumbai Office | 5,404.00 | |
| Pune Branch | 21,701.50 | 27,105.50 |
| Cash at Bank with | | |
| Saraswat Bank Ltd., Worli | 67,070.85 | |
| UCO Bank, Pune | 5,28,734.18 | 5,95,805.03 |
| Loan From Shikshan Nidhi | | |
| Ravindra R. Khambete | 20,000.00 | |
| Preeta Karmarkar | 10,000.00 | 30,000.00 |
| Loan From Pravartan Nidhi | | |
| Mohan Marathe, Sangali | | 10,000.00 |
| Mukund Marathe, Pune | | 13,000.00 |
| | TOTAL C/F | 21,51,724. 45 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | TOTAL B/F | 16,15,093.92 | | TOTAL B/F | 21,51,724. 45 |
| **Shourya Paritoshik Yojana** | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 3,398.00 | | | | |
| Add : Interest | 270.00 | 3,668.00 | | | |
| **Pune Dainandini Yojana** | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 1,37,426.00 | | | | |
| Add : Interest | 10,995.00 | 1,48,421.00 | | | |
| **Building Fund (Pune)** | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 81,422.00 | | | | |
| Add : Donations | 11,732.00 | | | | |
| Add : Interest | 7,438.00 | 1,00,414.00 | | | |
| **Current Liabilities & Provisions** | | | | | |
| Audit Fees | 1,500.00 | | | | |
| Contribution to Charity Comm. | 6,180.00 | | | | |
| Bakshis Anamat | 2,750.00 | 10,430.00 | | | |
| **Income and Expenditure Account** | | | | | |
| Balance as per Last Balance Sheet | 2,69,209.53 | | | | |
| Add : Surplus being excess of Income over Expenditure | 4,488.00 | 2,73,697.53 | | | |
| | TOTAL | 21,51,724.45 | | TOTAL C/F | 21,51,724.45 |

Subject to Our Report of Even Date

Note : The Headings as per the prescribed Form which are absent in the above Statement should be read as 'NIL'

**For Marathe Pratishthan**

The above Sheet to the best of our belief contains a true account of the Funds and liabilites and of the property & Assets of the Trust

**For HMA & Associates**
**Charterd Accountant**

**Trustee** **Trustee**

Memebership No. 103650
Mumbai, Date 22-08-2011

## मानसन्मान



**चि. अमोघ रविंद्र मराठे** (पृ.क्र.२८२) या वर्षी एस.एस.सी परीक्षेत ९८.५५% गुणांनी उत्तीर्ण झाला. मालाडच्या यशोधाम गोकुळधाम शाळांमध्ये पहिला आला. त्याला अभ्यासाचे ५१७ व खेळात प्राविण्याबद्दल २५ मार्क असे एकूण ५४२/५५० (बेस्ट ऑफ फाईव्ह) तत्त्वानुसार मिळाले. अमोघला महाराष्ट्र राज्य स्तरावर ४००मी धावणे या प्रकारात 'ब्रॉन्झ' मेडल मिळाले.

तसेच २००९ साली 'सीडस ऑफ पीस' या अमेरिकन दूतावासातर्फे चालवण्यात येणाऱ्या एनजीओ मधून चार आठवडे अमेरिकेत राहण्याची (सर्व त्यांच्याच खर्चाने) संधी मिळाली. इथे एकूण अकरा देशांचे प्रतिनिधी चार आठवडे 'सांस्कृतिक देवाण-घेवाण' कार्यक्रमात एकत्र राहिले होते. याची निवड निबंधलेखन - ग्रुप डिस्कशन - मुलाखत अशाप्रकारे होती.

या सर्वांबरोबर आता पुढे इलेक्ट्रॉनिक्स विषयात काही विशेष करण्याची तसेच ॲथलेटिक्स कायम खेळण्याची त्याची इच्छा आहे. चि. अमोघचे वडील श्री. रविंद्र दिनकर मराठे हे इंजिनिअर असून एअरइंडियात एअरक्राफ्ट मेंटेनन्स इंजिनिअर म्हणून नोकरी करतात, तर आई सौ. हेमांगी फिलॉसॉफी/सायकोलॉजी या विषयात एम.ए. आहे. 'योग' व्यायामप्रकारात 'कैवल्यधाम' चर्नीरोड येथून निवासी 'शिक्षक' अभ्यासक्रम उत्तीर्ण असून गेली २५ वर्षे योगाचे क्लासेस घेत आहे.

# प्रतिष्ठान वृत्त

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करून यावे म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

शुक्रवार दिनांक २४ जून, २०११ला मराठे प्रतिष्ठानची बैठक संध्याकाळी चार वाजता मराठे उद्योगभवनात भरली. अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे, मोहनराव मराठे, हेमंत मराठे, श्रीनिवास मराठे, सी. गो. खांबेटे, श्रीमती सुलभाताई, श्री. प्रभाकर मराठे, डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे इ. मंडळी बैठकीला उपस्थित होती.

कार्यवाहांनी अहवालवाचन केले. प्रतिष्ठान-कडे पत्रव्यवहाराबाबत चर्चा झाली. जून २०११ 'हितगुज'चा अंक उत्कृष्ट निघाला म्हणून संपादिकेचे अभिनंदन केले. श्रीनिवास मराठे यांनी कुलवृतात्तांसाठी माहिती पाठविण्याचे कुलबांधवांना आवाहन केले आहे. त्याला प्रतिसाद पाहिजे तसा मिळत नाहीत अशी त्यांनी रास्त तक्रार केली. तरी कुलबांधव-भगिनींनी आपल्या घराण्याची माहिती त्यांना अवश्य कळवावी. संगणकावरील संकेतस्थळावर तपशीलवार नोंदी ऑनलाईन डाटाबेस पद्धतीने ते करीत आहेत. श्रीनिवास मराठे यांचा दूरध्वनी ०२२ - २४४५८६२१ व भ्रमणध्वनी : ९८३३२-१६४६८ हा आहे.

आदरणीय आप्पासाहेब मराठे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त कार्यक्रम करण्याचे अध्यक्षांनी सर्वानुमते ठरविले. दिनांक १८ जूनला जन्मशताब्दी होती. परंतु आप्पासाहेबांचे दोन्ही नातू श्री. वसंतराव व श्री. यशवंतराव परदेशी गेले आहेत. ते परतल्यावर ठरवू असे सुलभाताईंनी सांगितले. घाई नाही, सोयीने ठरवू असे त्या म्हणाल्या.

त्यानंतर वास्तूप्रकल्पाचा विषय निघाला. अध्यक्षांनी त्याबाबत माहिती सांगितली. श्रीनिवास मराठे यांनीही त्यांच्या नातेवाईकांपैकी एकाचे नाव सुचविले जो त्याचा फ्लॅट विकण्यास इच्छुक आहेत, त्याचा पाठपुरावा अध्यक्षांच्या मदतीने ते करणार असल्याचे ठरले.

हितगुज छपाई-टपालखर्च मंजूर करण्यात आला. भावी कोषाध्यक्ष श्री सुरेश वामन मराठे बैठकींना उपस्थित राहू शकत नसल्यामुळे सी. ए. श्री. प्रभाकर मराठे कोषाध्यक्षपदाची धुरा सांभाळत आहेत. अध्यक्षांनी त्यांना आय-व्यय ताळेबंद करण्याची विनंती केली.

श्रीमती सुलभाताईंनी आणलेल्या फराळाचा आस्वाद घेत चहापानानंतर बैठक संपली. दिनांक २२ जुलैला कार्यकारिणीची बैठक ठरविली आहे.

---

शुक्रवार दिनांक २२ जुलै २०११ला संध्याकाळी चार वाजता मराठे प्रतिष्ठानची बैठक उपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस यांच्या निवासस्थानी झाली. बैठकीला अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे, श्री. सी. गो. खांबेटे, श्री. चिंतामणी मराठे, लालबाग, श्री. सुरेश मराठे, डोंबिवली, श्री. प्रभाकर मराठे, श्री. हेमंत मराठे, श्रीमती सुलभाताई मराठे, रमाकांत विद्वांस, सौ. शुभाताई, डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे इ. मंडळी उपस्थित होती.

कार्यवाह श्री. हेमंत मराठे यांनी इतिवृत्त वाचले. आय-व्यय ताळेबंद कधी पूर्ण होणार यावर चर्चा झाली. चार्टर्ड अकौंटंट श्री. प्रभाकर मराठे यांच्यावर ती पूर्ण करण्याची जबाबदारी सोपवली. १९ ऑगस्टच्या आत आय-व्यय ताळेबंद पूर्ण करणार म्हणून सांगितले. त्यानंतर प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याचे ठरले. हितगुजमध्ये त्या कार्यक्रमाची प्रसिद्धी देण्यात येईल. चित्तपावन ब्राह्मणसंघाकडून आलेले पत्र वाचले. अहमदाबादचे श्री. प्रकाश विद्वांस यांना कुलवृत्तांताची झेरॉक्स प्रत पाहिजे होती. ती अध्यक्ष पाठविणार आहेत.

दिनांक १९ ऑगस्टला आनंदरावांची घरी पुढची बैठक घेण्याचे ठरवून चहा-फराळ झाल्यावर बैठक संपली. विशेष म्हणजे उपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस आणि सौ. शुभाताई यांच्या विवाहाला पन्नास वर्षे पूर्ण झाली म्हणून त्यांनी पेढे वाटले. सर्वांनी त्यांचे अभिनंदन करून सुवर्णमहोत्सवी वर्ष म्हणून अभिष्ट चिंतन केले. रविवार दिनांक २५ सप्टेंबरला वार्षिक सर्वसाधारण सभा सकाळी १० वाजता अखिल भारतीय कीर्तनमंदिरात घेण्याचे ठरविले.

## सहवेदना

आपले कुलबांधव श्री. विष्णू श्रीधर मराठे (पृ.१२०) यांचे मंगळवार दिनांक २८ जून २०११ला पुणे येथे दु:खद निधन झाले. कै. श्री. विष्णू श्रीधर मराठे यांचा जन्म १९३०चा. ते एल.एम.ई., एल.एल.ई., एच.एन.सी. (इंग्लंड) अश्या तीन पदव्या घेतलेले निष्णात इंजिनिअर होते. प्रथम मुंबईत प्रिमिअर ऑटोमोबाइल्स व बर्मा शेल कंपनीत नोकरी केली. नंतर भोपाळ येथे भारत हेवी इलेक्ट्रिकल्स (बीएचईएल) नोकरी केली. या कंपनीने त्यांना तीन वर्षाच्या प्रशिक्षणासाठी इंग्लंडला पाठविले होते. क्रीडा व नाट्यक्षेत्रात त्यांना रुची होती. निवृत्तीनंतर ते पुण्यास वास्तव्यास आले. त्यांच्या मागे त्यांची सुविद्य पत्नी नंदिनी, मुलगा डॉ. माधव (अमेरिकेत असतो.), मुलगी सौ. पुष्पा, सून डॉ. सौ. अचला, चि. सलील, कु. मालविका, कु. अपर्णा ही नातवंडे असा परिवार आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारे कै. श्री. विष्णू श्रीधर मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली! कोषाध्यक्ष श्री. प्रभाकर मराठे यांचे ते (बापू) काका होते.

## मराठे प्रतिष्ठानचे भीष्मपितामह कै. भाऊसाहेब मराठे यांनी श्री. कालिदास मराठे यांना पाठविलेली पत्रे

*हितगुजचा जून २०११ अंक आज मिळाला. भाऊसाहेबांच्या निधनाची बातमी वाचून अतिशय दुःख झाले.*
*माझा त्यांचा पत्रव्यवहार होता आणि दूरध्वनीवरून बोलत असू.*
*त्यांची तीन पत्रे मी जपून ठेवली आहेत. पत्रावली संग्रहासाठी त्याच्या प्रती पाठवित आहे. या पत्रावरून त्यांचे जे दर्शन होते ते महत्त्वाचे आहे.*
*कुलवृत्तांचे संपादक, हितगुजचे (एकटाकी हितगुज माझ्या संग्रही आहेत.) संपादक म्हणून त्यांनी केलेली कामगिरी अविस्मरणीय.*
*माझी, माझ्या कुटुंबाची त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली*

आपला
कालिदास मराठे. (पृ.५४१)

।। श्री।।

सनीव्हेल,
८ जून ९८
सप्रेम नमस्कार,

*तुम्ही अगत्यपूर्वक पाठविलेले कन्येच्या लग्नाचे निमंत्रण २३ मे रोजी, नेमके लग्नाच्या दिवशीच मिळाले. हा एक योगयोगच. त्या दिवशी व नंतर ३१ मे रोजीच्या अभिनंदन समारंभाच्या वेळी आम्ही उभयतांनी तुम्हा मंडळींच्या गोव्याच्या अशा पुष्कळ आठवणी काढल्या.*

*मात्र हे पत्र मुद्दामच उशीरा लिहित आहे. कारण तुमच्या गडबडीच्या दिवसात तुम्हाला पत्र वाचायलाही फुरसत मिळणे कठीण.*

*सर्वप्रथम चि. कांचन व श्री. गुरुनाथ यांचे अभिनंदन करतो. सुखी आणि समृद्ध वैवाहिक जीवनासाठी आमच्या शुभेच्छा त्यांना पोहोचत्या कराव्या. आपल्याकडील दोन्ही समारंभ दिमाखात पार पडले असतीलच.*

*गेल्या चार-पाच महिन्यात तुमची-आमची अप्रत्यक्ष भेट होण्याच्या संधी अनेकदा आल्या. लग्नाचे निमंत्रण हे त्यातले अगदी अलीकडचे.*

*रत्नागिरी विशेषांकात 'गोमंतकालीन गणमान्य मराठे' यादीत तुमच्या नावाचा शोध घेत होतो. पण नाव सापडले नाही. अपुऱ्या माहितीच्या आधारावर लिहिणारा कोण हा माणूस म्हणून वर लेखकाचे नाव पाहिले तर काय तो खुलासा झाला. तुमच्या जागी मी असतो तर कुठेतरी माझे नाव घुसवून दिले असते.*

*मार्च९८ च्या हितगुजच्या अंकात तुम्ही वडिलांना आदरांजली वाहिली आहे. त्यातील 'म्हणून आज आम्ही गोव्यात कोणीतरी आहोत' या उक्तीमधून तुमच्या जिद्दीचे दर्शन झाले. बरे वाटले. उत्तरोत्तर अशीच प्रगती होत राहो अशी सदिच्छा व्यक्त करतो.*

*त्याच अंकात आपल्या बहिणीचा तुम्हा भावंडांच्या आईवरील लेख आला आहे. तो वाचून असाही खडतर प्रवास कोणाला करावा लागतो याचा पत्ता लागला. परिस्थितीशी अजिबात झगडावे न लागता आम्ही इथवर वाटचाल केली याबद्दल नियतीचे आभार मानावे तेवढे थोडेच. लेखाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये केलेल्या प्रार्थनेत आम्हालाही सहभागी करून त्याने मातोश्रींना आम्हा उभयतांचा सप्रेम नमस्कार कळवावा.*

*मुंबईत असताना आपली कार्डाकार्डी झाली होती. त्यानंतर पुन्हा पत्र लिहिण्याचा योग तुम्ही आणून दिलात त्याबद्दल आभार.*

सर्वांना स.न./अ. आ. कळावे

आपला
वि. गो. मराठे

।।श्री।।

सॅनहोजे
१० जून ९९
श्री. कालिदास यांस सप्रेम नमस्कार,

आम्ही इथली सर्व मराठे मंडळी खुशाल आहोत. तुम्ही तीन आनंदाच्या गोष्टी कळविल्या त्यात आणखी एका गोष्टीची भर पडली. ती म्हणजे तुमचे पत्र आले. अशा हाताने लिहिलेल्या पत्राचे दिवसेंदिवस मोठेच अप्रूप असणार आहे. मला वाटतेएक दिवस असा येणार की कोणीच हाताने काहीच लिहिणार नाही.

कॉम्प्युटर आणि ई-मेल या सोयींमुळे इकडच्या जगात तरी कागद व पेनाची मक्तेदारी संपुष्टात आली आहे. मुंबई-पुण्याच्या आमच्या कुटुंबीयांकडे ई-मेल आहे. अमेरिकेतल्यांकडे तर आहेत. त्यामुळे आमची पत्रापत्री आजकाल कॉम्प्युटर द्वाराच होत असते. तरीही मला हस्तलिखित

पत्र पाठवायला/मिळायला आवडते. शिवाय घरी इंटरनेटची सोय असली तरी वृत्तपत्राची ओढ वाटते. दरवाज्यात येऊन पडलेले वृत्तपत्र आत घेऊन नंतरच इतर व्यवहार चालू होतात.

आजोबा झालात त्याबद्दल अभिनंदन. आजीचेही! बाळंतपण माहेरी झाले असेल तर तुमच्याकडेच मोठी धमाल असणार. डिंकाचे, आळीवाचे लाडू, तुपात भिजवलेली खारीक, अधूनमधून बदामाचा शिरा-खीर यातले तुम्हाला काही मिळते ना? की नुसताच ओवा-शेप्याच्या धुरीचा वास?आजोबाला ही हक्क असतात म्हणावे.

आमच्या मनात तुम्ही केव्हाचेच उपसंचालक झालेले आहात. म्हणजे तुमचे उशीरा अभिनंदन. या पुढील पद संचालकाचे असावे. ते क्षितिजावर दिसू लागले आहे का?

पुस्तकाच्या नावावरून काही बोध झाला नाही. ज्या अर्थी तुम्ही लिहिले आणि प्रकाशन संस्थेने प्रकाशित केले त्या अर्थी चांगलेच असणार. कदाचित 'हितगुज'कडून काही समजले तर. पुन्हा एकवार अभिनंदन! आम्ही उभयता आता दुसऱ्या ----जागेत राहतो. सोयीची आणि सर्वतोपरि सुखाची आहे. पत्ता/फोन असा : V.G. Marathe, 2760 Mckee Rd # 210, SAN HOJE, CA 95127, U.S.A. (Phone 408-937-0230)

वर्षभर आम्हाला पूर्वीच्या पत्त्यावर आलेली पत्रे पोस्टखाते नव्या पत्त्यावर पाठविण्याची सोय आता ३० ऑक्टोबरला संपेल. तरी नवा पत्ता नोंद करून घ्यावा. म्हणजे आणखी आनंदाच्या बातम्या कळविताना उपयोगी पडेल,

गोव्याच्या इलेक्शनच्या बातम्या परवा टीव्हीवर पाहिल्या. कपाळी गुलाल, गळ्यात हार, ताशेवाजंत्री, धूमधमाल! इकडच्या पार्श्वभूमीवर गमतीच्या वाटाव्या.

श्री. कृष्णा यांच्याकडची बातमी बऱ्याच दिवसांपर्यंत समजली नाही. त्यांचीही आठवण अनेकदा येते. गोव्याच्या संमेलनाचीदेखील.

आमचा आराम असतो. पण वेळ बरा जातो. ब्रिज क्लब, सिनिअर सेंटर, घरची कामे, सर्व अजून आम्हा दोघांनाही जमते. प्रकृत्या ठीक आहेत. घरच्या सर्वांना सप्रेम नमस्कार

कळावे,

आ. वि. गो. मराठे

प्रेषक : श्री. कालिदास बाळकृष्ण मराठे (पृ.५४१)

श्री, २१०, ढवळी, पो. कवळे, ता. फोंडा, गोवा ४०३ ३०१

फोन : ०८३२-२३१३८०५

## वाचकांचा पत्रव्यवहार

आजच जून २०११चा हितगुज अंक मिळाला. थोडा चाळला व पूर्ण वाचल्यावर काय प्रतिक्रिया देणार ती आत्ता लिहीतोय. तसे म्हटले तर आमच्या बडोद्याचे सदाशिव बळवंत मराठे आठ दिवसापूर्वी भेटून हितगुजचा अंक त्यांना मिळाल्याचे व त्यात वाचकांच्या पत्रव्यवहारात माझे नाव आल्याचे सांगून गेले म्हणून अंक पाहण्याची उत्सुकता होती व त्यांना मी श्रद्धा निर्भेळ असले तर संकटातून सोडवते हा लेख आला नाही का विचारले होते व ते म्हणाले होते माझ्या पाहण्यात नाही. माझा अंक संपादिकांनी माझा पत्ता मिळाला नाही म्हणून परत आल्याचे सांगितल्यावर पत्ता कन्फर्म करून पुन्हा पाठविल्याचे बोलल्या. सदाशिवरावांनी घरी जाऊन हितगुज पुन्हा वाचला व माझा लेख छापून आल्याचे फोनवरून सांगून तुला अंक मिळाला नाहीतर मी वाचायला देईन सांगितले व आज अंक मिळाल्यावर आपल्याला पत्र लिहित आहे. व सदाशिवरावांना कळवित आहे. आपले कुटुंब, आपले गाव, आपले आडनाव, आपला लेख ह्याविषयी किती उत्सुकता असते हे हितगुज वाचताना कळते. जानेवारीत मी लेख लिहिला व त्यातच प्रतिक्रिया व्यक्त केली होती ती जूनमध्ये छापून आली. आपणच लिहिलेले छापून आल्यावर किती बरे वाटते कारण ते बरेचजण वाचतात. ते छापून आले नाही तर आपण मनात जे पुटपुटतो तसे वाटते. आपली प्रतिक्रिया स्वतंत्र छापली व अनुभव स्वतंत्र छापला. त्याबद्दल आभार. आमच्या सदाशिवरावांचा जुन्या बडोद्याच्या माझ्या स्मृती (बक्षीसपात्र निबंध) वाचला. कारण ह्या स्पर्धेत मी पण भाग घेतला होता. व बक्षीस समारंभाला उपस्थित होतो. पण लेख वाचायला मिळाला नव्हता. हितगुजमध्ये बरेच वाचण्यासारखे असते व ते वाचल्यावर आपल्या ज्ञानात भर पडते तेव्हा आपले कौतुक करावे तेवढे थोडे.

हल्ली स्वअक्षरात लिहिण्याची सवय नाही. गेल्यावेळेस कुरिअरने दोनदा टपाल पाठविले, पण आता पोस्टाने पाठवित आहे. माझ्या मोबाईलवर पोस्टकार्ड मिळाल्याचा एसएमएस करावा. आपला आभारी राहीन.

**- मोहन मराठे (पृ.४२२)**

बडोदा

# आनंदाचं झाड

**सौ. श्यामला पुरंदरे (जाईल)**

परवाच एका दुकानात गेले होते - ज्येष्ठ नागरिकांनी ज्येष्ठांसाठी चालविलेले. आत शिरताच एका फलकाने लक्ष वेधून घेतलं. त्यावर लिहिलं होतं. 'इकडे जरा बघता का? मोठ्याने बोलू नका. आरोग्य सांभाळून दुसऱ्याच्या उपयोगी पडा म्हणजे अडगळ न होता एक ॲसेट बनाल. धन्यवाद.'

किती प्रॅक्टिकल आहेत नाही हे शब्द? जीवनाच्या या उत्तररंगामध्ये मन खूपच हळवं बनतं. आपलीच माणसे आपल्याला टाळत आहेत असं वाटायला लागलं की झोप उडून जाते. या २१व्या शतकात माणसे अडगळीसारखी वाटायचं कारण म्हणजे बदललेली समाजव्यवस्था होय. सुमारे चाळीस वर्षांपूर्वीपर्यंत एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये चार पिढ्या एकत्र नांदत. कामाची विभागणी होत असल्यामुळे नो टेन्शन! घर लहान असू दे वा आर्थिक परिस्थिती बेताची, प्रत्येक व्यक्तीला सिक्युअर्ड वाटे. फक्त निर्जिव वस्तूकडेच अडगळ म्हणून पाहिलं जाई. पण औद्योगिकीकरणाचे वारे वाहू लागले व जॉईंट फॅमिली झाली न्यूक्लिअर. 'हम दो हमारे दो' च्या या संकुचित घरकुलामध्ये प्रत्येकालाच प्रचंड स्ट्रेस, मग कळू लागलं की 'खरंच, घरी कोणी तरी समजूतदार, प्रेमळ व शांत वडिलधारी माणूस पाहिजे.' माणुसकी अशातच आहे की स्वत:च्या व्यक्तींना केवळ घरातच नाही तर हृदयातदेखील स्थान द्यायला हवं. अशोवळी प्रत्येकानेच, अगदी लहानापासून ते थोरापर्यंत, तडजोड करावीच लागते. ज्येष्ठांनी काही कामे आपणहून आनंदाने स्वीकारावीत जसं बँकेत जाणे, छोट्यांना स्कूलबससाठी नेणं, टेलिफोन वगैरे बिल भरणं, स्वत:ची दिनचर्या अशी सुरेखपणे आखावी ज्यामुळे दुसऱ्याला त्रास न होता आपले छंदही जोपासता येतील. हा वानप्रस्थाश्रम आहे हे लक्षात ठेवून लुडबूड न करता शक्य असेल तेवढा मदतीचा हात पुढे केला तर आपण सर्वांना हवेहवेसे वाटू. समाधान तृप्ती यांच्या बिया आपणच रुजवायच्या असतात. आपुलकीचं, स्नेहाचं पाणी वेळोवेळी घालायचं असतं, समजूतदारपणाचं खत द्यायला लागतं म्हणजे आनंदाचं झाड बहरेल.

**श्यामला पुरंदरे**
२७ ब, वृंदावन सोसायटी,
पंचवटी, पाषाण,
पुणे ४११ ००५
दूरध्वनी : ९४२२५२१७२४

---

**मराठ्यांची माहेरवाशीण श्रीमती इंदूताई हरि मराठे (पृ.१२०) तथा शकुंतला गोविंद नामजोशी यांच्या सहस्रचंद्रदर्शन सोहळ्यानिमित्त लहान बहीण सौ. उषा हिने केलेली कविता**

**आमची ताई**

*सुहास्य वदनी अशी आमुची आहे सोशिक ताई*
*सर्वांशी ही आपुलकीने वागतेच ग बाई ॥१॥*

*आधी आहे ताई आमुची, मग ती तुमची आई*
*सासू होता सुनांचे हे, कौतुक तिजला बाई ॥२॥*

*नातू, नाती तिजला म्हणती, आमची आहे आज्जी*
*कल्याणीच्या मनालीची, ती मग झाली पणजी ॥३॥*

*विविध ही नाते जरी ही असले, हसत मुखाने असते*
*हे जीवन म्हणजे असते जणू हे, देवा घरचे देणे ॥४॥*

*सुख दु:खे ही जीवनात या, आली आणी गेली*
*स्मृतीगंधाच्या ठेवी तुझ्या, हृदयी ठेवून गेली ॥५॥*

*आज जरी हे नाना नसती, अपुल्या याच ही जगती*
*स्वर्गातून हे आशिर्वच हा, तुजला आजच देती ॥६॥*

*ऐंशी वर्षे पूरी जाहली, शुभदिन आहे आज*
*शुभचिंतन हे करण्यासाठी, आम्ही आलो आज ॥७॥*

*दीर्घायुषा हे लाभो तुला, हीच मनीची इच्छा*
*सुख, समृद्धी अशीच लाभो, हीच आमुची सदीच्छा ॥८॥*

*शब्द फुले ही घेऊन त्यांचा पुष्पगुच्छ हा मी केला*
*प्रेमभराने देते तुजला, स्वीकारी गं तूं त्याला*
*स्वीकारी गं तूं त्याला, स्वीकारी गं तूं त्याला ॥९॥*

*('नाना' - कै. गोविंदराव नामजोशी (ताईचे यजमान))*

**- सौ. उषा वि. लेले (मराठे)**
मुंबई

## तू फुलत राहा, उमलत राहा : प्रमिला ते मंगला... एका आनंदयात्रीचा प्रवास

**श्री. राजा मराठे**

*विख्यात चित्रकार श्री. राजाभाऊ मराठे यांनी मराठे प्रतिष्ठानच्या 'हितगुज' मासिकाचा लोगो तयार केला. या आधीची हितगुजची मुखपृष्ठेही त्यांच्या कुंचल्यातून रेखाटली गेली आहेत. हितगुजच्या २५व्या रौप्यमहोत्सवी अंकाचे सुंदर मुखपृष्ठही त्यांनी चितारले होते.*

गेल्या शतकात घडलेल्या समाज परिवर्तनाच्या तुलनेनं चालू दशकात घडणारा बदल क्रांतिकारक ठरण्याची स्पष्ट लक्षणे दिसत आहेत. सभोवती नजर टाकली तर सगळी घरं धावताना दिसत आहेत. नोकरीतील स्पर्धा, पोटासाठी स्पर्धा, जीवनमान टिकवायचं म्हणून स्पर्धा... सारी घरं फक्त धावताहेत. ज्यांच्यासाठी ही सारी धावपळ चालली आहे, त्यांना तर कदर नाही. वळून पाहायला कुणाला वेळ नाही, परिश्रमांची एकूण बेरीज... फक्त निराशा! या भयाण धावपळीत जगण्याचा सुगंधच घालविलेली पिढी! अशा वातावरणात एका दुर्गम खेड्यात थोड्या वेगळ्या वाटेने चालणाऱ्या एका मुलीचा जन्म झाला. प्रमिला, तिचं नाव.

तू मोठी होऊन लागलीस तसं तुझं हसणं, खेळणं, दुडुदुडू धावणं पाहताना वर्ष केव्हा सरली ते कळलंच नाही. तुझे खेळ पाहताना घराच्या सगळ्यांना गंमत तर वाटलीच परंतु माईच्या कमरेचा पदर कौतुकानं ओठापाशी कितीवेळा गेला असेल याची गणतीच नाही. तुझं शिक्षण सुरू झालं. राजापूरच्या कन्याशाळेतील अभ्यासक्रम आटोपून पुढील शिक्षणासाठी तुला मुंबईस पाठवायचे वारे वाहू लागले. यशावकाश तू मुंबईस दाखल झाली. माई-बाबांचा, बरोबरीच्या भावंडांचा सहवास अंतरणार म्हणून तुझं मन कष्टी झालं. परंतु दुसरा पर्याय नव्हता. शाळा कॉलेजचं शिक्षण सुरू झालं. अभ्यासाची मनस्वी आवड तसंच शाळा कॉलेजच्या अनेक सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये प्राविण्य दाखविल्यामुळे झालेलं कौतुक. पुष्पगुच्छ मिळाले. ... काटे बाजूला सारून सुगंध तेवढा जपलास त्यामुळे पुढचा मार्ग सुकर झाला. नाटकातून केलेल्या विविध भूमिकांमुळे पुढील आयुष्यात अनुभवाची शिदोरी हाताशी आली. कॉलेजचं शिक्षण पुरं झालं. शिक्षण क्षेत्रात नव्या व्यवसायास प्रारंभ झाला. नऊवारी साडी जाऊन पाचवारी मध्ये वावरणं आता प्रशस्त वाटू लागलं. व्यवसायाच्या निमित्ताने अनेक मैत्रिणींशी गट्टी जमली. परंतु इंदू सामंत, ताई गावकरसारख्या मैत्रिणींनी आजतागायत हाताची मिठी घट्ट ठेवली त्यामुळे खरी मैत्री किती खोलवर असतं याचं प्रत्यंतर आलं.

तुझा विवाह झाला. चारित्र्यसंपन्न यजमानांची सोबत आयुष्याला उभारी देणारी ठरली. कमू, विजू, रत्ना सारखी पाठची भावंडं तुझ्या सावलीत वाढली. त्यामुळे आई दूर असूनसुद्धा मायेचं छत्र विनासायास सर्वांनाच मिळालं. रवी, महेन आले. महेनने तर आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या वैयक्तिक उच्चांकाची मोहर लावली. त्यांच्याबरोबर अंजली, आरती सारख्या कर्तव्यदक्ष मुली सुना म्हणून घरात आल्या. नातवंडाबरोबर गप्पागोष्टी करता करता घरासमोरील बाग अधिक बहरली. आता आप्तस्वकियांच्या सहवासात थोड्या मोकळ्या गप्पा मारण्यासाठी लाभलेला एक निवांत क्षण तुझ्या स्वाधीन आहे.

विद्यार्थ्यांच्या जुन्या आठवणीत तू थोडी रमली आहेस. मावळत्या सूर्याच्या रंग छटा तुझ्या खिडकीतून घरात अलगद विसावल्या आहेत. आयुष्याच्या संध्याकाळी हे सारं पाहताना थोडं हसू पण येत आहे. झाडावर बसलेली कोकिळ आजसुद्धा गोड गळ्यानं गात आहे. कुंडीतील फुलांचा सुगंध तस्साच दरवळतो आहे. घरट्याकडे परतण्याची पाखरांची लगबग आजसुद्धा लोभसवाणी दिसत आहे. स्वाध्याय अभ्यास वर्गाची नित्यनेमाने भरणारी बैठक आज सुद्धा भरणार आहे. तुमच्या प्रार्थनेतील हे शब्द प्रत्येक घरात समाधानाची श्रीमंती देणार आहेत.

वसो नित्य माझ्या मुखी रामनाम,<br>
फुलो भक्तिने नित्य माझेही धाम।<br>
नसो दु:ख चिंता कधीही भवाची,<br>
अशा राघवा वंदिते मी प्रभाती।।

अशा नैमित्तिक घडणाऱ्या बैठकीतून जीवनाचा आनंद कुणीतरी भेटतं व आपण सुद्धा त्यात हरवून जातो. म्हणून निसटणारे हात घट्ट घेऊन नात्यातील प्रेम जागं ठेवणं ही आजची गरज आहे.

प्रिय ताई, नात्यातला हा स्नेहाचा सुगंध जपण्याचं काम तू आजन्म केलंस व करीत आहेस. तुझ्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त आम्हा समस्त परिवाराकडून शतशत वंदन.

३०मे,२००६

आपला<br>
अण्णा

**प्रेषक : चित्रकार राजा मराठे**<br>
१४, उद्यम,उद्यमकुंज सोसायटी,<br>
राणी सती मार्ग, मालाड(पू)<br>
मुंबई ४०००९७<br>
फोन नं. : ०२२-२८७७८६३९

**खापरपणजोबा श्री.शिवराम अंताजी मराठे यांच्या पुण्यस्मरणार्थ यांच्या प्रेमळ स्मृतीस अभिवादन**

सी.ए. प्रभाकर मराठे (पृ.१२०) ८/१३, सहकारनगर, वडाळा, मुंबई ४०० ०३१<br>
सेल : ९८२०२३२०८२ दूरध्वनी : २४१५०८८९ई-मेल : **prabhakar_marathe@yahoo.com**

# पाण्यात वाहून गेला संसार...

**कल्पना देसाई-विद्वांस**

दिनांक १२ जुलै २०११ ला पानशेत धरण फुटून ५० वर्षे पूर्ण झाली. त्यात पुण्यातील अनेक भागांची वाताहात झाली. अशाच एका भयानक संकटाला, जिला सामोरे जावे लागले त्या कुलभगिनीचा अनुभव प्रकाशित करीत आहोत

- संपादिका

१२ जुलै १९६१. सकाळचे साडेअकरा वाजले होते. आईकडे मी आणि धाकटा भाऊ (११ व ९ वर्ष) 'जेवायला वाढ शाळेत जायला उशीर होतोय.' अशी भुणभुण करीत होतो. सकाळपासून आईची गडबड उडाली होती. पूर येणार, नेहमीपेक्षा मोठा पूर येणार म्हणून बातम्या येत होत्या. त्यावेळी वाड्यात कोणाकडेच रेडिओ नव्हता. ऐकीव बातम्यांवरच सर्व विसंबले होतो. अधिक काही कळायला मार्ग नव्हता. माझ्या बालबुद्धीला एकच प्रश्न पडला की पाऊस नाही, नदीचं पाणी वाढलेलं नाही तर पूर कसा येईल? आमचा रायरीकरांचा वाडा ओंकारेश्वर देवळासमोरच होता. स्वयंपाकघराच्या खिडकीतून नदी सहज दिसायची. कधी कधी स्मशानात जळणारी प्रेतंसुद्धा! पण कधी भीती वाटायची नाही. जेव्हा पावसाळ्यात नदीला पूर यायचा तेव्हा आम्ही सर्वजण तो पाहायला नेहमी जायचो. मुलांची पुरात पोहण्याची चढाओढ लागायची. खेळण्यासाठी तर देऊळ आणि परिसर म्हणजे आमची हक्काची जागा!

वडील नोकरीनिमित्त मुंबईला होते. आई आम्हा चार भावंडांना घेऊन एकटीच राहायची. मोठा भाऊ आणि बहीण सकाळीच शाळेत गेली होती. आई एकटी असली तरी वाड्यातील माणसे तिला सामान वरच्या मजल्यावर नेण्यासाठी मदत करीत होती. नुकतंच वर्षाचं धान्य भरलं होतं. ते भिजू नये म्हणून वर पोचवलं. आम्ही तळात राहात होतो. आईची नुसती धावपळ उडाली. शेवटी आम्ही कसंतरी वाढून घेतलं. जेवायला सुरुवात करणार एवढ्यात कोलाहल झाला. बातमी आली 'पाणी आलं, असाल तसं पळा.' आम्ही पानावरून उठलो. पुढील बाजूने पाण्याचा लोंढा आत घुसला होता. तिथून बाहेर पडणे अशक्य झाले. वाड्याला मागील बाजूस थोड्या उंचीवर एक छोटीशी बाग होती. तिला लागून नू.म.वि.शाळा. बागेला ४-६ पायऱ्यांचा लाकडी (तोडका-मोडका) जिना होता. त्यावरून बागेत येऊन आम्ही बोळात उतरलो, तेच मुळी कंबरभर पाण्यात! सहज वाड्याकडे नजर पडली. पाहतो तर काय? मातीचा तो जुना वाडा क्षणात पाण्यात जमीनदोस्त झाला. सारं संपल्याची भावना आईला किती त्रास देऊन गेली असेल? असं वाटलं.

आता फक्त जीव वाचवणं महत्त्वाचं होतं. आळीतील तरुण पट्टीचे पोहणारे होते. त्यांनी जिवाची शर्थ करून सर्वांना पाण्यातून काढलं आणि प्रत्येकाने वाट फुटेल तशी धाव घेतली. एका टप्प्यावर पोहोचून हुश्श करावं, तर तिथेही पाणी येणार म्हणून बातमी यायची. मग परत पळापळ! असे तीन-चार टप्पे पार करत आम्ही उंबऱ्या गणपतीपाशी हाडं चोळणाऱ्या लिमयांच्या वाड्यात येऊन धडकलो. आता पोटातील आतड्यांना भुकेची प्रचंड जाणीव झाली. कुणीतरी जेवणाची व्यवस्थाही केली. कसे तरी एकदाचे चार घास घशाखाली ढकलले. कोणाचेच धड जेवणात लक्ष नव्हते. इथेही पुराचे पाणी आले तर? ही एकच भीती सर्वांना वाटत होती. आता आम्हा लहानग्यांसुद्धा या भयानक संकटाची जाणीव झाली. संध्याकाळचे चार-पाच वाजले होते. शाळा सोडून दिल्या होत्या. मोठ्या भावा-बहिणीला आमच्यापर्यंत कोणी पोहोचवलं? काहीच कळलं नाही. सर्वजण जिवंत असून एकत्र आहोत, याचंच समाधान होतं. लिमयांच्या वाड्याने बऱ्याच बेघरांना आसरा दिला होता. तिथून आम्ही वडिलांच्या मित्राकडे - आगाश्यांच्या वाड्यात श्रीयुत फाटक यांच्याकडे गेलो. रात्रीपर्यंत वडील आणि मामा आम्हाला कपडे घेऊन मुंबईहून आले. दुसऱ्या दिवशी आम्ही खच्चून भरलेल्या रेल्वेने मुंबईची वाट धरली. पानशेतच्या पुराने सारंच उद्ध्वस्त केलं होतं. आमच्या हाती लागली फक्त चिखलात रुतलेली लोखंडी कॉट आणि पत्र्याची चिखलाने माखलेल्या कपड्यांची ट्रंक!

**कल्पना देसाई-विद्वांस**
**प्रेषक : सौ. मीना सदानंद मराठे**
**(पृ.४१७)**
खार, मुंबई

## सहवेदना

भटवाडी-वेंगुर्ले येथील श्री. कृष्णा दिनकर ऊर्फ बबन मराठे (७५) यांचे २६ जुलै रोजी पहाटे अल्प आजाराने निधन झाले. ते अविवाहित होते. त्यांचे मागे बंधू प्रभाकर (रसकुमारी औषधाचे उत्पादक) बहिणी, पुतण्या असा परिवार आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. कृष्णा दिनकर ऊर्फ बबन मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

## हितगुज राखीव फंड निधी

श्री. सदाशिव बळवंत मराठे, बडोदे, श्री. श्रीनिवास अनंत मराठे,दादर, श्री. प्रभाकर विद्वांस, अहमदाबाद, सौ. उषा विठ्ठल लेले, कुर्ला, मुंबई या देणगी दिलेल्या कुलबांधवांचे मराठे प्रतिष्ठानद्वारा आभार.

विशेष सूचना : हितगुज राखीव फंड निधी - देणगी शक्यतो चेकद्वारे 'मराठे प्रतिष्ठान' या नावाने संपादिकेच्या पत्त्यावर पाठवावी.

# वासु चिंधु बुरुड तथा वासुदेव महाराज

**श्री. अच्युत चक्रदेव** (पृ.७३२)

येरवडा मध्यवर्ती कारागृहात 'प्रवेशद्वार तुरुंगाधिकारी' म्हणून मी कार्यरत होतो. असाच एके दिवशी दुपारी बंदींना दाखल करण्याचे काम मी करीत असताना एक पोलीस निरीक्षक व चार-पाच पोलीस एका बंदीला घेऊन माझेकडे आले. बंदीच्या दाढी, जटा वाढलेल्या होत्या. कपाळाला भस्म, गंधाचे पट्टे ओढलेले, कानात भीकबाळ्या असे त्याचे स्वरूप होते. पोलीस निरीक्षक म्हणाले, ''साहेब, हा बंदी नवीन नाही, हा तुमचा जुनाच पॅरोलवर तीन वर्षांपूर्वी सुटलेला बंदी आहे. भोरजवळील नसरापूरकडील वांगणी गावचा हा आहे. हा तुमचेकडून पॅरोल रजेवर (अर्जित रजा) सुटला, गावाकडे वांगणीला गेला. रजेचे अटींप्रमाणे त्याने महिनाभर गावाकडे राहून पुन्हा शिक्षा भोगण्यासाठी कारागृहात हजर होणे आवश्यक होते; पण त्याने नियम तोडला आणि हा गावाकडेच राहिला.'' मी बंदीकडे पाहिले, पण मला काही ओळख लागेना तेव्हा त्याला मी जरा दरडावून विचारले तेव्हा त्याने त्याचे नाव वासु चिंधु बुरूड असे सांगितले व तो लाकूडकाम विभागात कामाला होता असे सांगितले व अधिक काही न बोलता पॅरोलवर सुटताना नियमाप्रमाणे त्याला 'मुक्तता प्रमाणपत्र' दिले जाते तेच पिशवीमधून काढून त्याने मला दाखवले. मुक्तता प्रमाणपत्रावर त्याचे नाव, बंदी क्रमांक व इतर तपशील नमूद केला होता.

पोलीस निरीक्षक म्हणाले, ''हा ठरलेल्या दिवशी पुन्हा हजर झाला नाही म्हणून आमचे पोलीस स्टेशनला कारागृहाकडून तसा अहवाल आला आणि आमची तपासाची चक्रे फिरू लागली. हा बंदी आता 'वासुदेव महाराज' या नावाने वावरतो आहे. दोन-चार दिवस घरी काढल्यावर याने जवळचाच एक डोंगर गाठला. त्या डोंगरावर एक जुने शंकराचे पडके देऊळ होते, तेथे त्याने त्याचा मुक्काम ठोकला आणि यथावकाश हा गावात 'वासुदेव महाराज' म्हणून ओळखला जाऊ लागला. लोक डोंगरावरील शंकराचे दर्शनास येत तेव्हा साहजिकच या वासुदेव महाराजांचेही पाया पडत. हाही त्यांना आशीर्वाद देत असे. त्यातले सुमारे ५० टक्के आशीर्वाद खरे होत. ज्यांचे बाबतीत हे आशीर्वाद खरे होत ते लोक या 'वासुदेव महराजां'चा उदो, उदो करत व त्यांचे भक्त बनत. त्यामुळे पंचक्रोशीत महाराज प्रसिद्ध झाले. शंकराचे जुने पडके देऊळ होते ते त्याने गावकऱ्यांचे मदतीने स्वच्छ केले. काही किरकोळ दुरुस्त्याही करून घेतल्या. याचे घरचे कुटुंबीयही याचे दर्शनासाठी म्हणजे भेटीसाठी येत. पण त्यांनीही कुणाला काहीच थांगपत्ता लागू दिला नाही. पण तरीही कुठेतरी काही बंदोबस्त कमी पडला आणि वासुदेव महाराजांच्या अस्तित्वाचा पत्ता पोलिसांना लागला. पोलिसांनी गावात शोध घेतला. पण व्यर्थ. त्यांना ही बातमी समजली व कोणी नवीन साधूमहाराज डोंगरावरील देवळात आले आहेत हे समजले. पोलिसांचा ताफा डोंगरावर देवळात आला. पोलीस निरीक्षकही वासुदेव महाराजांचे पाया पडले. व त्यांनीही त्यांचे आशीर्वाद घेतले; पण महाराजांचे संशयित वागणे, प्रश्नांना उत्तर न देणे किंवा अपुरी उत्तरं देणे हे पोलिसांचे नजरेतून सुटले नाही. त्यांनी मनाशी एक निर्णय घेतला व महाराजांना ताबडबोब बेड्या ठोकण्याचे आदेश दिले.

आता 'वासुदेव महाराज' पोलिसांचे पाय पकडू लागले व अटक न करण्याबद्दल पोलिसांची विनवणी करू लागले. महाराजांचे मदतीला त्यांचे काही तथाकथित भक्तगणही धावले व महाराजांना अटक करू नये म्हणून तेही पोलीसांची विनवणी करू लागले. पण पोलीस बधले नाहीत. पोलिसी खाक्या त्यांनी बरोबर दाखवला व त्यांनी महाराजांना बेड्या घातल्या व त्यांच्याच वांगणी गावातून त्यांची मिरवणूक काढली. त्यांना त्यांची उर्वरित शिक्षा भोगण्यासाठी वर नमूद केल्याप्रमाणे येरवडा मध्यवर्ती कारागृहांमध्ये आणले. कारागृहाचे नियमाप्रमाणे मी त्यांना 'खटल्यासाठी' अधिक्षकांचे साप्ताहिक फेरीचे वेळी अधिक्षकांचे समोर उभे केले. अधिक्षकांनी तपशीलवार चौकशी केली व महाराजांनी कारागृहात असताना शिक्षेमध्ये जी माफी मिळवली होती ती सर्व कमी करून टाकली, रद्द केली. पूर्वीच्याच लाकूडकाम विभागात त्यांना काम दिले.

अशी आहे ही वासु चिंधु बुरुड तथा वासुदेव महाराजांची कथा

**अच्युत महादेव चक्रदेव (पृ.७३२)**
कारागृह अधिक्षक (निवृत्त)
२६, शुक्रवार पेठ, भाऊमहाराज बोळ,
पुणे ४११००२

## हसरे हितगुज

एक माणूस टपरीवर जातो आणि सामोसा मागतो. सामोसा आल्यावर तो फक्त आतला मसालाच खातो. ते बघून टपरीवाला म्हणतो, ''अरे, हे फक्त मसालाच काय खातोस.''

माणूस म्हणतो,''अरे बाबा, डॉक्टरने बाहेरचे खाण्यास मनाई केली आहे.

गंपू : अरे कधी तरी मोबाइल सुरू ठेव... जेव्हा, फोन करतो तेव्हा 'यह नंबर स्विच्ड ऑफ है'
झंपू : अरे वेड्या, ती तर माझी कॉलर ट्यून आहे.

## सोमनाथ मंदिरातील चमत्कारिक अनुभव

नुकतेच (फेब्रुवारी २०११) आम्ही उभयता पती-पत्नी सोमनाथ-द्वारका दौऱ्यावर गेलो होतो. वेरावळ येथे गुजरात टुरिझमच्या अतिथीगृहात राहिलो होतो. त्यावेळी सोमनाथ दर्शनासाठी गेलो. सकाळी दहा वाजता रांगेतून दर्शन घेतले. अतिशय भव्य आणि देखणे असे हे मंदिर नव्याने बांधले गेले आहे. मंदिराचा सभामंडप खूपच मोठा व भव्य आहे. दर्शनानंतर पुन्हा आरतीसाठी म्हणून दुपारी बारा वाजता मंदिरात गेलो. मला स्वत:ला वयामुळे (७५वर्षे) व गुडघेदुखीमुळे खाली बसता येत नाही. पत्नी मात्र स्त्रियांच्या रांगेतून पुढे जाऊन बसली. मी त्या विस्तीर्ण सभामंडपाच्या एकदम मागे जाऊन एका पायरीवर बसून राहिलो. त्यामुळे मला आरतीनंतरचे दर्शन होणार नाही असे वाटत होते. घंटानाद, ध्वनिक्षेपकाचा मोठा आवाज यामुळे आरतीचे शब्द ऐकू येणे शक्य नव्हते. पण मी श्रद्धापूर्वक इतरांबरोबरच आरतीच्या तालावर टाळ्या वाजवीत राहिलो. रांगेतील लोक हळूहळू आरतीनंतरच्या दर्शनासाठी पुढे सरकत होते. इतक्यात एक साधारणत: पुजाऱ्यासारखी दिसणारी व्यक्ती गाभाऱ्यातून बाहेर पडून गर्दीतून वाट काढीत माझ्या दिशेने आली व त्या व्यक्तीने माझा हात धरून दर्शनासाठी चला असे खुणेने सांगितले कारण काही ऐकू येणं शक्य नव्हतं. व हाताला धरून पुढे पुढे नेले. त्याला कुणाचा विरोध झाला नाही. दर्शनाच्या ठिकाणी नेऊन हात जोडून दर्शन घ्या असे सुचविले. त्यानंतर मी दानपेटीत दक्षिणा अर्पण करून श्री सोमनाथाचे जवळून दर्शन घेतले व बाहेर आलो. नंतर पत्नीने त्या व्यक्तीने माझा हात धरून दर्शन घडविले ते पाहिल्याचे सांगितले. त्यानंतर ती व्यक्ती मला पुन्हा दिसली किंवा भेटली नाही. ही घटना म्हणजे सोमनाथाची कृपा असावी किंवा माझ्या तीव्र इच्छाशक्तीचा प्रभाव असावा. मला स्वत:ला मात्र ही श्री सोमनाथाची कृपाच वाटली.

**श्रीराम व्यंकटेश मराठे (पृ.४३)**
बि.नं.२, फ्लॅट नं. ६ चंद्रलोक नगरी, डहाणूकर कॉलनी
कोथरूड, पुणे ४११०३८

## पुण्य स्मरण



**कै. सौ. सुधा स. मराठे**
**निर्वाण : दि.१२-१-२०११**

*बोट धरूनी शिकविलेस तू, नित्य आम्हा संस्कार नवे*
*सुपुत्र होण्या जीवनात या, नव्या आदर्शाच्या सवे*
*स्नुषा जणू लेकीच तुजला, प्रेमाशीर्वाद सदा पाठीशी*
*कर्तव्याची कास धरावी, शिकवण आम्हा नित्य तुझी*
*नातवंडे ही सदैव स्मरती, तुझ्या मायेच्या साठवणी*
*उबदार तुझ्या त्या कुशीमधल्या, बालपणीच्या आठवणी*
*सर्व दु:खे ही जीवनातली, जाती पळोनी माघारी*
*मिळोनी जेव्हा सारे आम्ही, जातो त्यांना सामोरी*
*तुझ्या आठवणींची शिदोरी, घेऊन आता बरोबरी*
*आयुष्याच्या वाटा जाती, आनंदाच्या मार्गावरी*

*- अंजली*

तुझ्या आशीर्वादासह तुझी स्मृती कधीच न विसरणारे आम्ही :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| हेमंत | * | राजेंद्र | * | आशुतोष |
| दीपिका | * | दिप्ती | * | अंजली |
| नीरज | * | आदित्य | * | अभिषेक |

**मराठे प्रतिष्ठान संस्थेस खूप खूप शुभेच्छा!**

# गड्या, आपुला गाव बरा!

**सुनीती मराठे (पृ. १८०)**

अशीच परिस्थिती, परदेशात स्थलांतरित झालेल्या भारतीयांची आहे. अरत्र ना परत्र, त्रिशंकूसारखी. परत इथे येऊन, ते आता ह्या मातीत समरस होऊ शकणार नाहीत. तिथल्या भौतिक सुख समृद्धीपुढे, प्रगत तंत्रज्ञानापुढे इथली घाण, प्रदूषण, आळस, भ्रष्टाचार, टंचाई, चंगळ-वाद, नीतिमूल्यांचा ऱ्हास, याला तोंड देणे त्यांना शक्यच नाही. पण तरीही आपल्या सणसमारंभांचा, संस्कृतीचा, वाङ्मयाचा, कलेचा, मैत्रीचा, नात्यांचा धागा घट्ट पकडून ठेवायचा त्यांचा अट्टाहास असतो. शरीराने तिथे आणि मनाने इथे. पण इथे आले म्हणजे जाणवते, हे नाही आपल्या आठवणीतले पूर्वीचे जग. इथे नाही निभायचे आपले. एकूण काय ही न परतीची वाट असते.

काही दिवसांपूर्वी गंमतच झाली बरं का! मी आणि माझा भाऊ आमच्या कोकणातल्या गावी गेलो होतो, माझ्या काका-काकूंना भेटायला. काळ इतका पुढे गेला; पण त्या दगडी कौलारू घराचे रूप अजून तसेच आहे. माजघर, स्वयंपाकघर, ओटी, पडवी असे. आता तिथे तसे म्हटले तर घरात सगळ्या सोयी आहेत. बटण दाबले की वीज आहे, गोबर गॅस प्लॅन्टमुळे घरात गॅस आलाय. विहिरीवर पंप बसवून घरात नळ आलाय. पूर्वीचे दिवस आठवतात. अंधार पडल्यावर कंदिल किंवा चिमणीच्या उजेडात, सगळे व्यवहार. त्या अपुऱ्या उजेडात, भिंतीवरच्या सावल्यातून भूते-राक्षस दिसायचे. पाणी विहिरीवरून रहाटाने ओढावे लागायचे. संडास शेतात तर बाथरूम तोंडलीच्या वेलाखाली चार पत्रे लावून. स्वयंपाकघर लाकडाच्या धुराने भरून जायचे. हे सगळे जरी बदलले आहे, तरी बाकी सगळे अजून तसेच आहे. तेच बाह्यरूप, तशाच सारवलेल्या जमिनी, कौलारू छप्पर. घरात दिवसासुद्धा अंधारलेले, लख्ख उजेड नाहीच कसा तो. मला तर रात्री तिथे नीट झोपच लागत नाही. उंदीर कौलावरून धावत असतात, पाली चुकचुकतात. मनात विंचू, सापांचे, भूताखेतांचे भय दाटून येते.

तिथे भोवतालाच निसर्ग अजून तसाच आहे. काळ जसा पुढे जायचेच विसरला आहे. अंगणातली लाल माती, तुळशीवृंदावन, बकुळ, चाफा, पारिजातक, इतर फुलझाडे, गोठ्यात हंबरणारी गाय-वासरे, दाट झाडी, शेतीवाडी, दारात कलमाची झाडे, चार माड, अगदी सगळे चित्रातल्या सारखे. ओटीवरचा झोपाळा कड्यांचा आवाज करत मंद झोके देत असतो. आंब्याच्या आढ्या पडल्या होत्या, हवे तितके घ्या आणि खा. हिशेब नव्हता. सगळ्यांच्या भेटी झाल्या. मग परत निघण्याचेच वेध लागले मनाला. परत मुंबईला घरी आल्यावर, आम्हाला हुश्श झाले. आम्ही एकमेकांना म्हणालो, ''खेड्यामधले घर कौलारू' हे गाण्यात आळवायला आणि चित्रात पाहायलाच बरे असते. आपल्याला नाही निभायचे इथल्या गर्दी, गडबड, गोंधळ याशिवाय. मुंबईचे सिंगापूर नको की शांघाय नको. आमची रुटस या मुंबईतच आहेत. 'ऐ ऽ दिल है मुश्कील, जिना यहाँ। जरा हटके, जरा बचके ये है मेरी बंबई मेरी जान।।'

'गड्या आपुला गाव बरा!' हेच शेवटी खरे ना?

**-सुनीती मराठे (पृ.१८०)**
माटुंगा

## पर्यावरण

पर्यावरणाबद्दल आजकाल फारच ओरड चालू आहे. या ओरडीशिवाय पूर्वी सारे काही व्यवस्थित चालत होते. जंगलातून झाडे वाढणे बीजरूपाने चालूच होते. लहान वनस्पती, गवत वगैरे पावसाळ्यात उगवून नंतर उन्हाळ्यात सुकून जातात. त्याचे बीज पडून पुन्हा उगवणी चालू असते. हे सृष्टीचे चक्र आनदिकालापासून चालू आहे. जंगलातून मोठ्ठी झाडे आपोआप उगवून वाढत जातात. आता जळणासाठी, इमारतीसाठी व बिल्डिंगसाठी तोडली जाऊन लागली आहेत. त्यामुळे वृक्षांचे प्रमाण कमी होत आहे हे खरे पण काही नवीन लावली जात आहेत हे जरूरी आहे. पर्यावरणाचे नावाखाली जास्त ओरड करणे बरोबर नाही. आजकाल जंगलतोड, वनविभाग यामुळे वृक्षतोड वगैरे प्रमाण कमी झाले आहे. तरीपण माझे माहितीप्रमाणे पूर्वीज भाजावळीसाठी कवळ - लहानलहान झुडपे कापून उपयोग करीत असत. अर्थात या तोडीमुळे झुडपे नष्ट होत नाही कारण त्याची मुळे तशीच राहतात व त्याला परत फूट येऊन वाढतात. त्याचप्रमाणे लहान लहान झाडे उदा. बावा, चांदा, खेर, शिवण, बागूळ, साग वगैरे. ही झाडे (खडसत) - मूळ खोड व वाढलेला भाग याच्या फक्त फांद्या कापून लाकडांसाठी व जळणासाठी वापरीत असत. यामुळे झाडाचे नुकसान न होता ते वाढतच जाते. फांद्या परत फुटत असतात. या कापणीसाठी बंदी असायची जरूरी नाही तरी जंगलखात्याने याची माहिती देऊन अवगत करावे, व बंदी असली तरी उठवावी.

**- श्री. विठ्ठल शंकर लेले,** मुंबई

## निवेदन

पुणे येथे २१ डिसेंबर ते २५ डिसेंबर २०११ या कालावधीत चित्पावन फाउंडेशनतर्फे औद्यौगिक प्रदर्शन भरवले जाणार आहे. यातून विशेषत: तरुणांना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीकोनातून फायदा होऊ शकेल. या प्रदशर्नाच्या निमित्ताने अनेक कुलबांधव एकत्रित येण्याची शक्यता आहे. यामुळे रविवार दिनांक २५ डिसेंबर २०११ रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत मराठे प्रतिष्ठानतर्फे कुलसंमेलन आयोजित करण्याचा विचार आहे.

२३ डिसेंबर २००७ रोजी जागतिक चित्पावन महासंमेलन आयोजित करण्यात आले होते. त्याला प्रतिसादही खूप चांगला मिळाला होता. तेव्हा अनेक कुलबांधवांनी आडनावाप्रमाणे आपापली संमेलने आयोजित केली होती. परंतु तेव्हा मराठ्यांचे संमेलन होऊ शकले नव्हते. त्यामुळे अनेक मराठे कुलबांधवांनी नाराजी व्यक्त केली होती. यावेळी असे होऊ नये म्हणून २५ डिसेंबर २०११ रोजी मराठे प्रतिष्ठानतर्फे एक दिवसीय कुलसंमेलन आयोजित करण्याचा विचार आहे.

यासाठी संमेलन शुल्क प्रत्येकी २५० रु ठरवण्यात आले आहेत. यामध्ये सकाळचा चहा, नाश्ता व दुपारचे जेवण याची सोय करण्यात येणार आहे. तरी इच्छुक कुलबांधवांनी आपली नोंदणी व संमेलन शुल्क १५-१०-२०११ पर्यंत खालील व्यक्तींपैकी कुणाकडेही भरावे.

एक महत्त्वाची गोष्ट नमूद करावीशी वाटते की कमीत कमी शंभर लोकांची नोंदणी झाली तरच संमेलन भरवण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**१. सौ. नीलांबरी मराठे :** ६४२, नारायण पेठ, प्राथमिक नू.म.वि. समोर, अप्पा बळवंत चौक, पुणे ४११ ०३०. फोन : ०२०-२४४५६२७०/६५२००६९८

**२. श्री. अरुण दत्तात्रय मराठे :** १७५९, सदाशिव पेठ, भिकारदास मारुतीजवळ, पुणे ४११ ०३०. फोन : ०२०-२४४७३२८१

**३. श्री. श्रीनिवास गोपाळ मराठे :** त्रिवेणी नं.१, एरंडवणे, फ्लॅट नं.६, दख्खन पाटबंधारे सोसायटी, पांडुरंग कॉलनी, एस.एन.डी.टी कॉलेजसमोर, पुणे ४११ ०३८. फोन : ०२०-२५४६४७०६

**४. श्री. विजय विष्णू मराठे :** ९६२, बुधवार पेठ, मनोरमा अपार्टमेंट, खंडोबा मंदीर, विजयानंद थिएटरजवळ, पुणे ४११ ००२. फोन -०२०-२४४९४९४९/९४२३०११९४९

## मानसन्मान

चि. श्रेयस शरद मराठे, (पृ.२१), गोरेगाव, मुंबई याला दहावीच्या शालांत परीक्षेत ९५.८२% मार्कस मिळाले आहेत. चि. श्रेयसने मिळविलेल्या या भरघोस यशाबद्दल मराठे प्रतिष्ठानद्वारा श्रेयसचे हार्दिक अभिनंदन असेच घसघशीत यश भविष्यातही मिळो या शुभेच्छा!

(कार्यवाह श्री. हेमंत अरुण मराठे, नालासोपारा, यांचा श्रेयस हा पुतण्या आहे.)

**मनीप्लँटची पाने पाण्यात बुडवलेल्या कपड्याने पुसावीत. स्वच्छ तुकतुकीत दिसतात. मात्र काहीजण तेलाने पाने पुसतात. तशी पुसू नयेत.**

# आला पाऊस गं...

मे चे सरले कोवळे ऊन
आणि उजाडला आता जून
शिंपला पहिला वहिला पाऊस
तप्त धरतीचा उधळला सुवास
मरुताने नेला सर्वत्र गंध
सारे जग झाले त्यात धुंद
तरुणतरुणी उधळले चौफेर
ज्येष्ठानी जागीच धरिला फेर
वायूने उडविला जरी केरकचरा
वृद्धांचा मनमोर मात्र दिसे नाचरा
वृक्षवल्लरी झाल्या ओल्याचिंब
नकोच होते त्यांना आता सूर्यबिंब
चिमणपाखरांनी घेतली आकाशी झेप
अजून हवी होती त्यांना पावसाची खेप
जंगल प्राण्यानी धरली साखळी
आनंदाने नाचली सारी मंडळी
श्वानानाही नव्हते कसले बंधन
जणू गल्ल्यारस्ते दिले त्यांना आंदण
धरती मातेने फिरविली दृष्टी
दिसली तिला आनंदी सृष्टी
अभिमानाने वरुणाची मान ताठ
ओथंबले त्याच्या डोळ्यांचे माठ
साऱ्या जगाने केले त्याला मान्य
वरुण राजाही पावला धन्य धन्य

**सौ. नीलिमा विष्णू विद्वांस**
विकास कॉलनी मराठी शाळेजवळ,
मु. पो. ता. माणगाव. जि. रायगड
फोन : ०२१४०-६९५७६७

## साहित्यासाठी आव्हान

अपत्यप्राप्ती, जन्म-मृत्यू, परीक्षेतील यश, कला-क्रीडा, सामाजिक सेवा, समाजकार्यातील प्रगती, पदोन्नती, विवाह, परदेशगमन इ. आपल्या कुटुंबातील महत्त्वाच्या घटनांची माहिती 'हितगुज'मध्ये प्रसिद्धीसाठी पाठवावी. तसेच कथा, कविता, निबंध, ललित, वैचारिक साहित्य, विनोद, पाककृती, सुविचार इ. साहित्य पाठवावे ही विनंती.

## ।। श्री गणेशाय नमः।।

*जय देवा श्रीगणेशा प्रार्थितो मी भक्तीने*
*सर्वां उपकृत करावे, वंदितो तव चरणी ।।१।।*

*शत वर्षे प्रार्थिती भक्तगण मनोभावे*
*आतां भाव दिखाऊ, मागण्या मात्र अनंत ।।२।।*

*ऐके पुराणीतूं दिसतोस नटेश्वर*
*आतां परी तुज नाचविती नर्तकिसमान*
*पाहणे तुज हे बहु कष्टाते ।।३।।*

*तुझिया नामे जमविती माया (अर्थ) अमाप*
*व्यय मात्र अनाठायी - दिखाऊ ।।४।।*

*प्रथम तुज पूजिती प्रेमाने घरोघरी*
*टिळकांनी तुज आणले सार्वत्रिक*
*आता मात्र उद्देश झाला विफल ।।५।।*

*बुद्धी देवा द्यावी सर्वां सन्मार्गाची*
*दैन्य, दुःख, भक्तांचे द्यावे सांडोनी,*
*हीच प्रार्थना असे विठ्ठल नामे तुजसी ।।६।।*

**- श्री. विठ्ठल शंकर लेले,** मुंबई

## आस्वाद

''आस्वाद म्हणजे स्वाद न घेणे. स्वाद म्हणजे रूची. ज्याप्रमाणे औषध घेते वेळी आपण ते स्वादिष्ट आहे किंवा कसे याचा विचार न करता शरीराला त्याची जरूर आहे असे समजून ठरावीक प्रमाणात खातो. त्याचप्रमाणे अन्नाविषयी समजावे... शरीरपोषणासाठी आवश्यक नसातानाही मनाला फसविण्यसाठी आवश्यकतेचे आरोपण करून अमूक वस्तू अन्नात घालणे म्हणजे तर मिथ्याचारच होतो म्हटले पाहिजे.''

''या पद्धतीने विचार केल्यास आपल्याला दिसून येईल की आपण खातो-पितो त्यामध्ये अशा अनेक वस्तू आहेत की त्या आवश्यक नसल्यामुळे त्याज्य ठरतात आणि अशा तऱ्हेने असंख्य वस्तूंचा त्याग त्याच्याबाबतीत स्वाभाविक होऊन जाईल, त्याचे एकंदर विकार शांत होतील, 'एक तोलडी तर वानां मागे छे' (एक मडकी तेरा जिन्नस मागते.), 'पेट करावे वेठ' (पोटासाठी वेठ), 'पेट वाजां वगडावें' (पोट वाजंत्रे वाजायला लावते) या सर्व म्हणींमध्ये खूप अर्थ भरलेला आहे. या विषयाकडे इतके कमी लक्ष दिले गेले आहे, की व्रताच्या दृष्टीने अन्नाची निवड करणे जवळजवळ अशक्य होऊन बसले आहे. शिवाय लहानपणापासून आईबाप खोट्या प्रेमाला बळी पडून अनेक प्रकारचे जिह्वा-विलास करवून शरीर बिघडवून टाकतात आणि जिभेला कुत्रीसारखी (ताळतंत्र सुटलेली) करून सोडतात. त्याचा परिणाम असा होतो की वाढती पिढी शरीराने रोगट व रुचीच्या बाबतीत अतिशय बिघडून गेलेली अशी दिसून येते. याचे कटू परिणाम पावलोपावली आपल्या अनुभवाला येतात. अनेक खर्चात आपण पडतो, वैद्य-डॉक्टरांच्या मागे लागतो आणि शरीर व इंद्रिये आपल्या कह्यात ठेवण्याऐवजी उलट त्यांचेच गुलाम बनून जाऊन पंगुवत आयुष्य कंठितो...''

''आस्वाद व्रताचे महत्त्व आपल्याला पटले असेल तर आपण त्याचे पालन करण्याच्या प्रयत्नाला नव्या जोमाने लागले पाहिजे. त्यासाठी चोवीसही तास खाण्याचेच विचार करीत बसण्याची आवश्यकता नसते. केवळ सावधगिरीची, जागरूकतेची, अत्यंत आवश्यकता असते. असे करीत गेल्याने थोडक्याच काळात आपण स्वाद कोठे घेत असतो आणि कोठे शरीराच्या पोषणासाठी खात असतो हे समजत जाईल. हे समजू लागल्यावर आपण दृढतापूर्वक स्वाद कमी करत जावे... खरे पाहता आदर्श स्थितीमध्ये (स्वयंपाकासाठी) विस्तवाची जरूरी कमीत कमी पडावी, किंवा मुळी पडू नये. सूर्यरूपी महान अग्नी ज्या वस्तू शिजवितो त्यातूनच आपल्या खाद्याची निवड व्हावी. आणि या दृष्टीने विचार केल्यास मनुष्यप्राणी केवळ फलाहारी आहे असे सिद्ध होते. पण इतक्या खोलात शिरण्याची येथे आवश्यकता नाही. येथे तर आस्वादव्रत म्हणजे काय, त्यात कोणकोणत्या अडचणी आहेत किंवा नाहीत, तसेच ब्रह्मचर्य-पालनाशी त्याचा किती निकटचा संबंध आहे तेवढ्याचाच विचार करावयाचा होता. एवढे मनात ठसल्यानंतर सर्वांनी यथाशक्ती या व्रतात सिद्धी मिळविण्याचा शुभ प्रयत्न करावा.''

- महात्मा गांधी (मंगल प्रभात)

**प्रेषक : श्री. वा. ग. मराठे** (पृ.५०३)

# स्पर्श

*स्पर्शाची किमया आगळीच असते नाही?*
*मनुष्याचा जन्म होताच स्पर्शाची जादू सुरू होते*
*नवजात शिशुला दाई आणि त्याच्या आईच्या स्पर्शातील फरक कळतोच कळतो*

*आपल्या प्रत्येकाच्या बालपणी, आपण आजारी*
*असताना आपल्या आईने, आजीने, ताईने*
*अपाल्या जवळ बसून केसातून फिरवलेला हात*
*त्याचा स्पर्श. त्यामुळे क्रोसीन, ॲनॅसीनची भले काय हो गरज?*
*त्या प्रेमळ हाताच्या उबेनेच ताप निघून जात असतो.*
*केवढी किमया त्या स्पर्शाची !!*

*तरुणाईत प्रेमात पडलेल्या एखाद्या षोडशेचा (तरुणीचा) हात*
*तिच्या प्रियकराने हातात घेतला तरी नको नको*
*म्हणत ती त्याला हात हाती घेऊ देते,*
*तो त्याच्यावर असलेल्या सार्थ विश्वासामुळेच*
*त्या स्पर्शात तिला जाणवत असतो तो विश्वास! साथ निभावून नेण्याचा!*

*लग्नात कन्यादानाच्या क्षणी, आपल्या छातीवर*
*मणामणाचे ओझे ठेवून, बाप आपल्या लेकीला,*
*डोक्यावर हात ठेवून जेव्हा ''सुखी राहा पोरी''*
*असा आशीर्वाद देतो तो स्पर्श काही वेगळाच नाही?*

*माहेरपणासाठी म्हणून चाललेल्या नवविवाहितेला*
*तिच्या साथीदाराच्या चोरट्या स्पर्शातून एकच वाक्य*
*ऐकू येत असावे, ''लवकर ये ना!''*

*सासरी परत जाताना, लेकीच्या आईने मन घट्ट*
*करून सांगितलेले असते, आता जा पोरी पुन्हा सासरी!*
*जावईबापूंची हेळसांड होते*
*तो पाठीवर फिरवलेला हात! त्याची परिभाषा आगळीच*

*आपल्या घरांमधील वयस्कर मंडळी !!*
*काहीही अपेक्षा नसते हो त्यांची.*
*पण आपल्या अपत्याने फक्त समोर दोन क्षण बसून हातात हात*
*घेऊन जर विचारले की कसे आहात तुम्ही?*
*बरे आहात ना? तर त्यांच्या आनंदप्राप्तीची सर कशालाच येऊ शकणार नाही.*

*जीवनाच्या शेवटच्या टप्प्यात कवळी, काठी,*
*चष्मा, मानेचा पट्टा, वॉकर, गरम पाण्याची पिशवी,*
*ह्या आयुधांच्या साहाय्याने जगत असताना*
*एकमेकांना आधारू पाहणाऱ्या जोडीदाराच्या*
*स्पर्शात फक्त एकमेकांबद्दलची आत्मीयता असते नाही?*

*पण आपण सगळेच, ही स्पर्शाची जादू आजमावतो का हो?*

*आपले ठायी असलेला अहंकार, त्याच्या सावटाखाली*
*आपण त्या जादूई सुखाला झाकून टाकतो, दडपून टाकतो.*
*आणि मग उरतो तो दुरावा! वाढते ती दरी! नात्यांमधील! भावनांमधील!*
*काय म्हणता! पटतंय??*

**-श्री. संजय अ. मराठे**
*८ रिंजसी टॉवर्स, शंकर नगर*
*गंगापूर रोड, चित्रांगण शेजारी, नाशिक ४२२०१३*
*फोन : २३४३७०९  मोबाईल : ९८२२६९५३७१*

## प्रत्येकाचं स्वप्न, प्रत्येकाचं घर



घरातल्या प्रत्येकाच्या स्वप्नांचा आम्ही विचार करतो.
म्हणूनच आम्ही प्रत्येक गृहरचनेत मोकळेपणा, उत्कृष्ट जीवनशैली आणि आधुनिक सुखसुविधांचा
समावेश करतो. हे घर तुम्हांला सहजतेने घेता यावं यासाठी वाजवी दरही देतो.
हेच तर आहे निर्माण. तुमच्या स्वप्नांचे आणि सुंदर गृहरचनांचे !

विश्वसनीय परंपरा आणि पारदर्शक व्यवहार

निर्माण ग्रुप
ऑफ कंपनीज्
बिल्डर ॲंड डेव्हलपर्स

### आमचे आधुनिक जीवनशैलीचे प्रकल्प

मुंबईतील प्रकल्प स्थाने : महालक्ष्मी | जोगेश्वरी | मालाड (आझाद) | कांदिवली (पूर्व) आणि (पश्चिम) | गोवंडी | जोगेश्वरी

मुंबई बाहेरील प्रकल्प स्थाने : नेरळ | गोरेगाव आणि माणगाव | गणपतीपुळे

Project marketed by DREAMZ (A NIRMAN Group Enterprise)

हेड ऑफिस : 14, न्यायसागर, चिनॉय कॉलेज जवळ, जुना नागरदास रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - 400069
फोन : 91 9987686847 / 48 / 49 | SMS <DREAMZ> 567678


**BOOK POST**

**If undelivered,
please return to**

**संपादिका : 'हितगुज'**
८/१३, सहकार नगर,
वडाळा,
मुंबई - ४०० ०३१

**मराठे परिवाराला नवीन वर्ष सुखसमृद्धीचे व समाधानाचे, उत्तम आरोग्याचे आणि भरभराटीचे जावो, ह्या शुभेच्छा!**


त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल : (१) sitaram_khambete@yahoo.com (२) maratheparivar@yahoo.co.in ◉ वेबसाईट : www.marathepratishthan.org